• वर्ष : ०३ • अंक : २११ • पुणे • मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

इंग्रजी नोटिसांचा गुंता सोडा, मराठीत संवाद साधा!

3

अध्यक्षपदी सचिन मोरे यांची बिनविरोध निवड

4

ठळक बातम्या

मेफेड्रोन विक्री प्रकरणात ५ अटकेत

पुणे (आरंभ पर्व) : मेफेड्रोन (एमडी) विक्री प्रकरणात अमली पदार्थविरोधी पथकाने केलेल्या वेगवेगळ्या कारवाईत पाच जणांना अटक केली. त्यांच्याकडून २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अहिल्यानगर रस्त्यावरील केसनंद परिसरात अमली पदार्थविरोधी पथकाने कारवाई करून अनिस शम्मू सय्यद (रा. कल्याणी पार्क, मांजरी बुद्रुक), हरी उत्तम उफाडे यांना मेफेड्रोन बाळगल्याप्रकरणी अटक केली. त्यांच्याकडून दोन लाख ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चौकशीत त्यांच्या साथीदारांची नावे मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने प्रतीक दत्तात्रय होले (रा. लोणीकंद), ऋषीकेश अंकुश यनभर (रा. कारेगाव, ता. शिरुर) यांना ताब्यात घेतले.

उत्तर भारतासाठी नव्या रेल्वे गाड्या

पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातून उत्तर भारताकडे जाणाऱ्या नव्या रेल्वेगाड्यांना मंजुरी मिळाली असून, हडपसर ते वाराणसीदरम्यान 'अमृत भारत' रेल्वे सुरू करण्यात येणार आहे. तर, पुणे-जबलपूरदरम्यान धावणारी विशेष रेल्वे (स्पेशल ट्रेन) नियमित करण्याच्या निर्णयाला केंद्र सरकारकडून मंजुरी देण्यात आली आहे. याबाबत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पाठपुरावा केला होता. त्यानंतर केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नव्या रेल्वेगाड्यांना मंजुरी दिल्याची माहिती मोहोळ यांनी दिली. 'पुणे आणि परिसरातून मोठ्या संख्येने भाविक काशी, वाराणसी आणि प्रयागराजला जातात. प्रवाशांची गरज ओळखून मोहोळ यांनी हडपसर ते बनारसदरम्यान नवीन रेल्वे सुरू करण्याची मागणी केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देऊन रेल्वे मंत्रालयाने 'अमृत भारत' रेल्वेला मंजुरी दिली. ही गाडी हडपसर टर्मिनलवरून सुटणार असल्याने पुणे रेल्वे स्थानकावरील ताण कमी होण्यास मदत होईल आणि प्रवाशांनाही थेट वाराणसीपर्यंत जलद सेवा मिळेल,' असे मोहोळ यांनी नमूद केले. 'नव्या रेल्वे गाड्यांमुळे पर्यटनच नाही, तर व्यापार आणि रोजगाराच्या संधींना चालना मिळेल.

शिक्षक बदलीसाठी पहा वाट

यंदा जनगणना, मतदारयादीची विशेष पडताळणी मोहीम करावी लागणार असल्याने बदल्या नाहीच



सुगम आणि दुर्गम असे दोन भाग

शिक्षकांच्या बदली प्रक्रियेत सुगम आणि दुर्गम असे दोन भाग असतात. सुगम भागात असलेल्या शिक्षकांना दुर्गम भागात, तर दुर्गम भागात असलेल्या शिक्षकांना सुगम भागात पाठवले जाते. मात्र, आता बदल्याच स्थगित करण्याच्या निर्णयामुळे दुर्गम भागातील शिक्षकांना बदलीसाठी प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे काही शिक्षकांनी सांगितले.

पुणे (दै. आरंभ पर्व)

जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांना दर वर्षी शैक्षणिक वर्ष संपताना पुढील वर्षी होणाऱ्या बदलीचे वेध लागतात. मात्र, यंदा जनगणना, मतदारयादीची विशेष पडताळणी मोहीम (एसआयआर) अशी कामे शिक्षकांना करावी लागणार असल्याने जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्या करण्यात येणार नाहीत. ग्रामविकास विभागाने याबाबतच्या सूचना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

ग्रामविकास विभागाच्या उपसचिव वैशाली डिगे यांनी शुक्रवारी या संदर्भातील पत्र सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठवले आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या २०२७च्या जनगणनेच्या देशव्यापी वेळापत्रकानुसार राज्यात महाराष्ट्रात जनगणनेचा पहिला टप्पा १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत पूर्ण केला जाणार आहे. या दरम्यान सुमारे २ लाख ६४ हजार प्रगणक आणि पर्यवेक्षक प्रत्यक्ष घरांना भेट देऊन डिजिटल पद्धतीने माहिती संकलित करणार आहेत. तसेच मतदारयादीची विशेष पडताळणी मोहीमही राबवली जाणार आहेत. या दोन्ही कामांमध्ये शिक्षकांचा सहभाग महत्त्वपूर्ण असणार आहे. त्यामुळे शिक्षकांना मुख्यालय न सोडण्याचा आदेश यापूर्वीच देण्यात आले आहेत. जनगणना, तसेच मतदारयादीच्या विशेष पडताळणी मोहिमेतील सहभागाच्या सूचना शिक्षकांना देण्यात आल्या आहेत. त्यात जनगणनेचे काम असलेल्या शिक्षकांना मतदारयादीच्या विशेष पडताळणी मोहिमेचे काम देण्यात येणार नसल्याचे सरकारकडून सांगण्यात आले आहे. मात्र, काही शिक्षकांना दोन्ही कामांचा आदेश मिळाला आहे.

पुणे महापालिका पाठविणार जिल्हा पोलीसांना नोटीस !

पुणे (दै. आरंभ पर्व)

कायद्याचे पालन न करणाऱ्यांविरोधात कारवाई करणाऱ्या पोलिसांनीच नियमांकडे दुर्लक्ष केल्याचे समोर आले आहे. चतुःश्रृंगीच्या टेकडीवरून जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय, अभिमानश्री सोसायटीकडून बाणेर रस्त्याच्या दिशेने जाणारा नैसर्गिक नाला दस्तुरखुद्द जिल्हा पोलिसांनीच बुजविला असल्याचे समोर आले आहे. यामुळे अभिमानश्री व परिसरातील सोसायट्यांमध्ये पावसाचे पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पोलीसांना तातडीने नोटीस पाठवा, असे आदेश महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले. हा नाला बांधकाम करण्यासाठी पोलिसांकडून बुजविला जात आहे. त्यामुळे या परिसरात पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने महापालिका आयुक्त राम यांनी पावले उचलली आहेत. महापालिकेतील विरोधी पक्षनेते नीलेश निकम यांनी या संदर्भात राम यांना निवेदन देऊन योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी केली होती. या भागात राहणाऱ्या सोसायट्यांमधील नागरिकांनी महापालिका आयुक्तांची भेट घेऊन त्यांना येथील फोटो दाखविले.

स्थानिक नागरिकांनी दाखविलेले फोटो पाहिल्यानंतर महापालिका आयुक्त राम यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने जिल्हा पोलिसांना नोटीस काढण्याचे आदेश महापालिकेतील अधिकाऱ्यांना दिले. या बाबत अधिक माहिती देताना विरोधी पक्षनेते नीलेश निकम यांनी सांगितले, की बाणेर रस्त्यावरील जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आवारातून वाहणारा नैसर्गिक नाला बुजवून त्या ठिकाणी इमारत बुजविण्याचे काम सुरू आहे.

या भागात मागील वर्षी पावसाळ्यात संबधित नाल्यात कचरा असल्याने नाल्यातील पाणी लगतच्या अभिमानश्री सोसायटी तसेच इतर सोसायट्यांमधील बंगल्यांमध्ये शिरले होते. या संदर्भात तक्रार केल्यानंतर महापालिका प्रशासनाने नाल्याची सफाई केली होती. नुकतेच जिल्हा पोलिसांनी नाला बुजवूनच बांधकाम सुरू केल्याने यंदाच्या पावसाळयात भीषण परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. नाल्याची

हॉटेलमधील 'पनीर' खरेच पनीर आहे का?

मुंबई (दै. आरंभ पर्व)

हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये मिळणाऱ्या पदार्थांच्या गुणवत्तेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. अनेक ठिकाणी पनीरच्या नावाखाली 'चीज ॲनालॉग' वापरले जात असल्याचे प्रकार समोर आले असून, यामुळे ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असल्याची चिंता व्यक्त होत आहे. खाद्यपदार्थांमध्ये भेसळीचे प्रमाण वाढत असल्याच्या तक्रारी आधीपासूनच आहेत. अनेक ठिकाणी जुने तेल वापरून पदार्थ तळले जातात, तर काही ठिकाणी केवळ चव टिकवण्यासाठी निकृष्ट दर्जाचे घटक वापरले जातात. ग्राहक मात्र चवीवर भर देत असल्याने अशा प्रकारांना खतपाणी मिळते. दरम्यान, पनीर डिश ऑर्डर करताना ते खरेच दुधापासून बनवलेले पनीर आहे का, याबाबत शंका निर्माण झाली आहे. कारण पनीरऐवजी 'चीज ॲनालॉग' वापरून पदार्थ तयार केल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. पनीर हे पूर्णपणे दुधापासून तयार होते, तर चीज ॲनालॉग हे वनस्पतीजन्य तेल, स्टार्च आणि इतर कृत्रिम घटकांपासून बनवले जाते. या पार्श्वभूमीवर अन्न व औषध

प्रशासनाने (FDA) कठोर भूमिका घेतली आहे. रेस्टॉरंट आणि हॉटेल चालकांनी त्यांच्या मेनूकार्ड व बिलावर "चीज/पनीर ॲनालॉग" असा स्पष्ट उल्लेख करणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. ग्राहकांची दिशाभूल झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. तसेच, उत्पादक आणि पुरवठादारांनीही त्यांच्या उत्पादनांवर योग्य लेबलिंग करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ग्राहकांनीही पदार्थ खरेदी करताना 'ॲनालॉग'चा उल्लेख आहे का, याची खात्री करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या प्रकरणाची दखल राज्य सरकारनेही घेतली आहे. वाढत्या तक्रारींनंतर संबंधित विभागांना कारवाईचे आदेश देण्यात आले असून, भविष्यात अशा प्रकारांना आळा बसावा, यासाठी कडक नियम लागू करण्यात येत आहेत.

सुरक्षा रक्षकाला धमकावून ४० हजारांची रोकड लुटली

पुणे (दै. आरंभ पर्व)

सुरक्षारक्षकाला धमकावून ४० हजारांची रोकड लुटून नेल्याची घटना पाषाण परिसरात घडली. या प्रकरणी दुचाकीस्वार चोरट्यासह साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत शमसुद्दीन उर्फ समीर चाँदसाहेब ककेरी (वय २६, सध्या रा. कीर्ती गार्डन, पाषाण, मूळ रा. कर्नाटक) याने बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, दुचाकीस्वार चोरट्यासह साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ककेरी पाषाण परिसरात सुरक्षारक्षक म्हणून काम करतो. १२ एप्रिल



रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास ककेरी आणि त्याचा मित्र पाषाणमधील सुतारवाडी परिसरातून निघाले होते. त्या वेळी दुचाकीवरुन आलेल्या चोरट्यांनी ककेरी आणि त्याच्याबरोबर असलेल्या मित्राला अडवले. तू आमचे डेबिट कार्ड घेतले आहे, असे सांगून चोरट्यांनी त्यांना धमकाविण्यास सुरुवात केली. चोरट्यांनी ककेरीची झडती घेण्याचा बहाणा केला. त्यानंतर त्याला धमकावून खिशातील ४० हजारांची रोकड काढून घेतले. ककेरीने आरडाओरडा केला. खिशातील रोकड लुटून चोरटे पसार झाले.

ककेरीने गावाला पैसे पाठविण्यासाठी रोकड काढून खिशात ठेवली होती. त्याच्याकडील रोकड लुटण्याची घटना घडल्यानंतर तो घाबरला होता. त्याने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली.



बाबा भिडे पूल कधी सुरू होणार?

मुंबई (दै. आरंभ पर्व)

मेट्रोच्या कामांसाठी बाबा भिडे पूल अधे-मधे सारखा बंद करण्यात येत असल्याने मध्य पुण्यातून डेक्कन परिसरात जाणाऱ्यांची गैरसोय होते. मेट्रोचे काम कधी संपेल, याचे निश्चित उत्तर मिळत नसल्याने वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे.

वर्षानुवर्षे रेंगाळणाऱ्या कामांमुळे आधीच कोंडीत अडकलेल्या पुणेकरांना शहरातील एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणापर्यंत जाण्यासाठी अडथळ्यांची शर्यत पार करावी लागते. मेट्रोच्या कामांसाठी बाबा भिडे पूल अधे-मधे सारखा बंद करण्यात येत असल्याने सदाशिव पेठ, नारायण पेठेतून डेक्कन परिसरात ये-जा करणाऱ्यांना थोडे अधिकचे अंतर कापावे लागते. बऱ्याचदा वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. त्यामुळे बाबा भिडे पूल नियमितपणे कधी सुरू होणार, असा सवाल पुणेकर उपस्थित करतात. शहरे वेगाने वाढत आहे. वाहनांची

संख्या वर्षागणिक वाढते आहे. रस्ते रुंद करणे, पूल बांधणे, कॅमेरे बसवणे इत्यादी गोष्टी गरजेच्या आहेत. त्यासाठी नागरिकांना किती दिवस वेठीस धरले लागणार, याचे नियोजनही अपेक्षित असते. प्रत्यक्षात काम सुरू झाले, की ते अनेक वर्षे रेंगाळते. प्रशासनाकडून आश्वासने देण्यात येतात. काम संपत नाही; पण नागरिकांना कोंडीत अडकावे लागते. आता मेट्रोच्या कामांसाठी बाबा भिडे पुलावरून होणारी वाहतूक बंद करण्यात येते. असे असूनही मेट्रोच्या पुलाचे काम बराच काळ सुरूच आहे. अजूनही ते अपूर्ण असल्याचेच दिसते. त्यामुळे परिसरातील नागरिकांना ये-जा करण्यासाठीचा सोयीचा असलेला मार्ग बंद होतो. कित्येकदा वाहतूक कोंडीचा सामना करावा लागल्याने नागरिकांना मनस्तापाला सामोरे जावे लागते.

मेट्रोच्या पुलाचे काम पूर्ण झाल्यास अनेक नागरिकांना दिलासा मिळेल. परिसरातील रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी काही प्रमाणात कमी होईल. त्यासाठी पुणे महापालिकेने मेट्रो व्यवस्थापनाशी चर्चा करून मेट्रोच्या पुलाचे काम कधी पूर्ण करण्यात येईल आणि बाबा भिडे पुलावरील बॅरिकेड कधीपर्यंत काढले जातील, याची माहिती जाहीर करणे गरजेचे आहे.

थोडक्यात पण महत्वाचे

भव्य मोटारसायकल रॅली व महाआरती उत्साहात संपन्न

सिंहगड रोड (आरंभ पर्व) : आज वीरशैव धारेश्वर सेवा संघ व वीरशैव लिंगायत समाज, शिवणे (नांदेड सिटी) यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य दिव्य मोटारसायकल रॅली व महाआरती कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमातून समाजातील एकतेचा व बंधुभावाचा संदेश देण्यात आला. या रॅलीमध्ये विशेष आकर्षण ठरले ते श्रीरंग गणेश वसेकर यांचे. त्यांनी स्केटिंग शूज घालून संपूर्ण रॅली पूर्ण करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या या अनोख्या कौशल्याचे सर्व उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमास सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अध्यक्ष सचिन मोरे, नगरसेवक हरिदास चरवड, श्रीकांत जगताप,नगरसेविका ज्योतीताई गोसावी तसेच वीरशैव धारेश्वर सेवा संघ सिंहगड रोड, वीरशैव लिंगायत समाज शिवणे व लिंगायत समाज नांदेड सिटीचे अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी नावंदे सर, रमेश मिटकरी, सुनील वनपत्रे, रवी कल्याणी, महेश कुगावकर, बसवराज आमाने, बाळासाहेब कंगले, वसेकर, कापसे सिद्राम, चक्रे बाळासाहेब, घोडके पाटील, किरण मुळे, शिवलिंग तागडे, सोमनाथ गाढवे, राजू करजखेडे, तात्या नकाते आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले. रॅली व महाआरतीमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

बोपोडीत भीमगीतांनी रंगली सांस्कृतिक मैफल

पुणे (आरंभ पर्व) : छ. शिवाजी महाराज उद्यान, बोपोडी येथे आयोजित 'संयुक्त जयंती महोत्सव 2026' अंतर्गत सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.) छ. शिवाजी नगर मतदार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रसिद्ध शाहीर व खंजिरी वादक मीरा उमप यांनी आपल्या दमदार सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या भारूड व भीमगीतांनी संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाची सुरुवात 'भीमाला पहिले वंदन' या गीताने झाली. याप्रसंगी आयोजक, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष , पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, अविनाश कदम आदि मान्यवर उपस्थित होते.

पोकारी स्वेटतर्फे पुण्यात 'हायड्रेशन फॉर सिटी हिरोज' मोहीमेचा शुभारंभ

पुणे (आरंभ पर्व) : आयन सप्लाय ड्रिंकसाठी जागतिक स्तरावर नावाजलेल्या 'पोकारी स्वेट' या कंपनीने पुण्यात 'हायड्रेशन फॉर सिटी हिरोज' या मोहिमेचा शुभारंभ केला आहे. ही मोहीम पुणे कॅम्पमधील साधू वासवानी रोडवरील 'डीसीपी ट्रॅफिक ऑफिस, पुणे - २' येथे पाणी आणि क्षार पुरवठा मोहिमच्या (हायड्रेशन ड्राईव्ह) माध्यमातून राबवण्यात येणार आहे. या उपक्रमात ४० हून अधिक वाहतूक पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. शहराला गतीमान ठेवण्यासाठी सध्याच्या कडक उन्हातही न थकता काम करणाऱ्या या पोलिसांच्या कष्टाची दखल घेणे आणि त्यांच्या शरीरातील पाण्याची पातळी टिकवण्यासाठी त्यांना सहकार्य करणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

जांभूळवाडी तलावावर भीम गीतांचा गजर; मिरवणुकीने परिसर दणाणला

पुणे (आरंभ पर्व) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विश्वरत्न फाउंडेशनच्या वतीने जांभूळवाडी तलाव परिसरात आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. १२ एप्रिल रोजी भीम गीतांच्या कार्यक्रमाने उत्सवाची दमदार सुरुवात झाली असून, परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. १४ एप्रिल रोजी सकाळी सामूहिक वंदना उत्साहात पार पडली. यामध्ये लहान मुलं व युवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या विचारांचे प्रभावी सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. याप्रसंगी मधुकर जाधव यांनी प्रबोधनपर मार्गदर्शन केले, तर संस्थापक अध्यक्ष नरेंद्र भाऊ पारखे यांनी उपस्थितांना प्रेरणादायी विचार देत उत्साह वाढवला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात नरेंद्र भाऊ पारखे यांचे विशेष योगदान राहिले असून, त्यांच्या कार्याचे उपस्थितांकडून विशेष कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, महिला व लहान मुलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग लाभला. संध्याकाळी साडेपाच वाजता काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीने संपूर्ण परिसर दणाणून गेला. आकर्षक रथ, दमदार साऊंड सिस्टिम आणि जयभीमच्या घोषणांनी वातावरण भारावून गेले. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत मिरवणुकीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हा उत्सव संस्थापक अध्यक्ष नरेंद्र भाऊ पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. अध्यक्ष मधुकर लोखंडे, कार्यकारी अध्यक्ष सुभाष खडसे आणि उत्सव प्रमुख प्रभाकर शेंडगे यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. तसेच मिलिंद लोखंडे, नितीन ओव्हाळ, प्रकाश साळवी, निलेश जाधव, सुनील कांबळे, विलास जाधव आणि रवी जाधव यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे योगदान दिले.

अवैध दारू विक्री बंद करण्यासाठी आत्मदहन आंदोलन

पुणे (दै. आरंभ पर्व)

बार्शी तालुक्यातील अंबाबाईची वाडी, ज्योतिबाची वाडी व हत्तीज येथे गेल्या काही वर्षांपासून अवैध दारू विक्री सर्रासपणे सुरू असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. याबाबत स्थानिक वैराग पोलीस स्टेशन तसेच संबंधित विभागांकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

ही अवैध दारू विक्री तात्काळ बंद करण्यात यावी, या मागणीसाठी दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर आत्मदहन आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस (सोलापूर) नागेश चव्हाण यांनी दिली. श्रमिक पत्रकार संघ, पुणे येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. त्यांनी सांगितले की, सन २०२४ पासून या अवैध दारू विक्रीमुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. त्यामुळे या भागात दारूबंदी करणे अत्यंत गरजेचे आहे. स्थानिक पोलीस प्रशासनाकडून कुचकामी कारवाई होत असल्यामुळे अवैध धंदे पुन्हा जोरात सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. याबाबत अंबाबाईची वाडी ग्रामपंचायतीने ठराव मंजूर केला असून, हत्तीज येथील महिला भगिनींनीही हत्तीज ग्रामपंचायत येथे पाच दिवस उपोषण केले. तरीही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. अवैध दारू विक्री तात्काळ बंद करावी व कुचकामी ठरणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांच्या बदल्या कराव्यात, या मागण्यांसाठी आत्मदहन आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. यापूर्वी या विषयावर सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र तसेच विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथेही आंदोलन करण्यात आले होते. मात्र प्रत्येक वेळी कारवाईचे आश्वासन देऊन आंदोलन मागे घेण्यात आले.

यावेळी मात्र ठोस निर्णय होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार चव्हाण यांनी व्यक्त केला असून, या आंदोलनात संबंधित भागातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेसाठी राष्ट्रीय बंजारा परिषद शहर उपाध्यक्ष संदीप जाधव, ज्ञानेश्वर कोरडे, शंकर राठोड, निर्मला गायकवाड, शीतल साठे, कोमल साठे उज्वला माळी आदी मान्यवर उपस्थित होते.

७२ तासांनंतरही बंडगार्डन पोलिसांचा गुन्हा दाखल करण्यास नकार

पुणे (दै. आरंभ पर्व)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त ससून रुग्णालयासारख्या 'सायलेन्स झोन'मध्ये डीजेचा धणधणाट करून कायदाभंग करणाऱ्यांवर कारवाई करण्यात बंडगार्डन पोलीस अपयशी ठरले आहेत. पोलीस उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर यांनी गुन्हा दाखल करण्याचे स्पष्ट आदेश पोलीस निरीक्षकांना दिले असतानाही, ७२ तास उलटूनही बंडगार्डन पोलिसांनी कोणतीही कारवाई केलेली नाही. पोलिसांच्या या जाणीवपूर्वक दुर्लक्षाविरोधात मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते राहुल डंबाळे यांनी दिली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाची पायमल्ली राहुल डंबाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ससून रुग्णालय परिसरात झालेल्या नियमांच्या उल्लंघनाबाबत त्यांनी पोलीस उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर यांची भेट घेतली होती. यावेळी शिवणकर यांनी "संबंधित प्रकरणावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश बंडगार्डन पोलीस निरीक्षकांना यापूर्वीच दिले आहेत" असे स्पष्ट केले होते. मात्र, वरिष्ठांचे आदेश होऊनही स्थानिक पोलीस प्रशासन या प्रकरणाकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असून दोषींना पाठीशी घालत असल्याचा आरोप डंबाळे यांनी केला आहे.

काबुनीकडून शेन वॉटसन 'सुपर कोच' म्हणून नियुक्त

जागतिक क्रिकेट प्रशिक्षणाचे स्वरूप पालटण्याच्या महत्त्वाकांक्षेला पाठबळ

मुंबई (दै. आरंभ पर्व)

क्रिकेट प्रशिक्षणाची व्याख्या बदलणाऱ्या एआय आधारित 'काबुनी' या स्पोर्ट्स टेक्नॉलॉजी प्लॅटफॉर्मने आज ऑस्ट्रेलियाचा माजी अष्टपैलू खेळाडू शेन वॉटसन याची 'सुपर कोच' म्हणून नियुक्ती केल्याचे जाहीर केले. जगभरातील सर्व स्तरांतील खेळाडूंना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण सहज उपलब्ध करून देण्याच्या मोहिमेसाठी टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

काबुनीचे प्रगत तंत्रज्ञान आणि शेन वॉटसनचा क्रिकेटमधील दांडगा अनुभव या दोघा घटकांना या भागीदारीने एकत्र आणले आहे आणि त्यामुळे उदयोन्मुख क्रिकेटपटूंसाठी डेटावर आधारित अचूक माहिती आणि प्रत्यक्ष मैदानावरील अनुभव यांचा एक शक्तिशाली मिलाफ होणार आहे.

काबुनीचा हा मंच खेळाडूची हालचाल आणि चेंडूचा मार्ग रिअल-टाइममध्ये टिपतो. त्यामुळे पारंपारिक 'नेट प्रॅक्टिस'चे स्वरूप या पध्दतीमुळे बदलले गेले आहे. हे तंत्रज्ञान खेळाडूला साध्या आणि विविध कृतीशील सूचना देते. "एक टक्के सुधारणा" या अनोख्या दृष्टिकोनामुळे ही प्रणाली खेळाडूच्या लहान आणि त्वरित केल्या जाणाऱ्या सुधारणांवर लक्ष केंद्रित करते. त्यामुळे कालांतराने खेळाडूच्या कामगिरीत मोठी प्रगती दिसून येते. आवाज, व्हिडिओ आणि दृश्य संकेत यांचा एकत्रित वापर करून, काबुनी हे सुनिश्चित करते की खेळाडूंना मिळणाऱ्या सूचना या केवळ माहितीचा डोंगर ठरत नाही, तर या सूचना सहज समजण्याजोगा आणि अंमलात आणण्यासाठी सोप्या ठरतात. विशेषतः तरुण आणि प्रगतीचे नवीन शिखर गाठणाऱ्या खेळाडूंसाठी ही पध्दत अत्यंत उपयुक्त राहणार आहे.

शेन वॉटसन या उपक्रमात सामील झाल्यामुळे, उच्च दर्जाची क्रिकेट बुद्धिमत्ता आणि सहज उपलब्ध होणारे तंत्रज्ञान एकत्र आणण्याची काबुनीने आपली वचनबद्धता आणखी बळकट केली आहे. उच्च दर्जाचे प्रशिक्षण केवळ व्यावसायिक वातावरणापुरते मर्यादित राहू नये, या काबुनीच्या विश्वासाला यामुळे अधिक बळकटी मिळाली आहे. काबुनीचे सुपर कोच शेन वॉटसन नव्या जबाबदारीबद्दल बोलताना म्हणाले, काबुनीबद्दल मला जाणवलेली सर्वाधिक उत्कंठावर्धक बाब म्हणजे, प्रगती साध्य करण्याची पद्धत त्यांनी अतिशय सोपी केली आहे. क्रिकेट हा खेळ 'बारीक फरकांचा' आहे, आणि ते १ टक्के बदल ओळखून त्यानुसार कृती करण्याची क्षमता खेळाडूच्या शैलीत मोठा बदल घडवू शकते.कोणत्याही स्तरावरील खेळाडूंना सहज समजेल आणि त्यांना त्याचा फायदा होईल, अशी स्पष्टता काबुनी आपल्या प्रशिक्षणात आणते. उच्च दर्जाचे प्रशिक्षण सर्वांसाठी अधिक सहज उपलब्ध करणाऱ्या या प्लॅटफॉर्मचा भाग होताना मला खूप आनंद होत आहे."

अवैध गौणखनिज वाहतूक थांबविण्याची वायाळ यांची मागणी

कार्यालयास टाळे ठोकण्याचा इशारा

जुन्नर (दै. आरंभ पर्व)

माती माफिया माणिकडोह धरणाच्या जलाशयाचे हद्दीतून बेकायदेशीरपणे विना परवानगी माती उत्खनन करून राजरोसपणे हायवा, डंपर, ट्रक मधून वाहतूक करत आहेत. येथील जळवडी ग्रामपंचायत अंतर्गत खडकुंबे धरणक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर माती उत्खनन सुरू आहे.जुन्नरच्या पश्चिम आदिवासी भागात बेसुमार रात्री उशिरापर्यंत माती उत्खनन व वाहतूक सुरू असल्याची माहिती नॅशनल आदिवासी पिपल्स फेडरेशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मारुती वायाळ यांनी सांगितले. जुन्नरचे तहसीलदार यांनी संबंधित कुकडी पाटबंधारे विभागाचे अधिकारी यांना लेखी स्वरूपात कायदेशीर पत्रव्यवहार देखील केला आहे. जितेंद्र डुडी जिल्हाधिकारी,पुणे यांना देखील याविषयी कळविण्यात आले आहे. जळवडीचे सरपंच व ग्रामसेवक यांनी ग्रामसभेचा ठराव मंजूर केला त्यानुसार तहसीलदारांनी दिलेली परवानगी देखील रद्द केली आहे.असे असताना माती उत्खनन सुरू असल्याने संबंधित अधिकारी यांचे कार्यालयास टाळे ठोकण्याचा इशारा दिला असल्याचे वायाळ यांनी सांगितले. वायाळ म्हणाले, धरणामधून कोणत्याही प्रकारचे गौणखनिज उत्खनन व वाहतूक होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी लेखी सूचना जुन्नरचे तहसीलदार बाळासाहेब शिरसाट यांनी कुकडी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना केली आहे. तालुक्यातील येडगाव, माणिकडोह, पिंपळगाव जोगे या धरणातून अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूक रात्रंदिवस होत असल्याच्या तक्रारी महसूल विभागाकडे येत आहेत.सदर अनधिकृत उत्खनन व वाहतूक कुकडी पाटबंधारे विभागाच्या कार्यक्षेत्रातून होत आहे. येथे संबंधित अधिकारी वा कर्मचारी यांची नियुक्ती करावी. धरण क्षेत्रामधून गौणखनिज उत्खनन व वाहतूक करताना आढळल्यास सदर ठिकाणच्या ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांचेशी संपर्क करावा. सदर गौणखनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करावा.कुकडी पाटबंधारे कार्यक्षेत्रातील धरणामधून कोणत्याही प्रकारचे गौणखनिज उत्खनन व वाहतूक होणार नाही याची दक्षता घ्यावी. गौणखनिज उत्खनन व वाहतूक आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या विभागाची राहील याची नोंद घ्यावी असे कळविले मात्र त्याची दखल घेण्यात आली नसल्याने उत्खनन सुरू असल्याचे वायाळ यांनी स्पष्ट केले.

'मंगलमय' हे दिव्याचे तेल आता इन्स्टंट डिलिव्हरीसाठी उपलब्ध

पुणे (दै. आरंभ पर्व)

प्रीमियम खाद्यतेल आणि दिव्याच्या तेलाचे अग्रगण्य उत्पादक रेकॉन ऑईल इंडस्ट्रीज प्रा. लिमिटेड यांनी त्यांच्या लोकप्रिय 'मंगलमय' दिवा तेलाच्या उपलब्धतेची घोषणा केली आहे. हे उत्पादन आता झेप्टो, स्विगी इन्स्टामार्ट आणि बिग बास्केटवर उपलब्ध आहे.या धोरणात्मक विस्तारामुळे हैदराबाद, पुणे, मुंबई, नवी मुंबई, नागपूर, विशाखापट्टणम, गुरुग्राम, विजयवाडा, अहमदाबाद, रायपूर, वडोदरा, सुरत, नोएडा आणि दिल्ली या शहरांमधील ग्राहकांपर्यंत ब्रँड अधिक वेगाने पोहोचणार असून 'प्रत्येक दिवस मंगलमय' ही संकल्पना अधिक बळकट होणार आहे. निसर्गातील चांगुलपणा ग्राहकांच्या दैनंदिन जीवनात आणण्याच्या उद्देशाने रेकॉनने क्विक-कॉमर्स प्लॅटफॉर्म्ससोबत भागीदारी केली आहे. या प्लॅटफॉर्म्सवर उपलब्धतेमुळे पूजा-विधींमध्ये आवश्यक असलेली उत्पादने काही मिनिटांत घरपोच मिळतात, ज्यामुळे आधुनिक ग्राहकांच्या जीवनशैलीत सोयीसह परंपरेचे जतन करता येते. मौल्यवान भारतीय परंपरांना पूरक उत्पादने देत 'मंगलमय'ने आपल्या श्रेणीत एक अग्रगण्य स्थान निर्माण केले आहे. या विस्ताराचा उद्देश शहरी आणि निमशहरी कुटुंबांपर्यंत दैनंदिन पूजेच्या आवश्यक वस्तू सहज उपलब्ध करून देणे हा आहे.

वैयक्तीक हितसंबंध साधण्यासाठी वनविभागाची बदनामी

पुणे (दै. आरंभ पर्व)

सोलापूर वनविभागामधील लेखापाल. सिद्धेश्वर कैलास सगरे यास शासकीय कामकाजात अनियमितता, गैरवर्तन व महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम १९७९ चा भंग केल्याच्या कारणावरून निलंबीत करण्यात आले आहे. अशी माहिती सोलापूर वनविभागाचे उपवनसंरक्षक कुलराज सिह यांनी दिली. याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात त्यानी ही माहिती दिली आहे. या पत्रकात जनशक्ती शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष गणेश अभिमान भानवसे यांचे तक्रारी अर्ज कार्यालयास प्राप्त झाले असून या तक्रारींची वनविभागातील त्रिसदस्यीय समितीमार्फत चौकशी सुरू आहे असल्याचे नमूद करण्यात आले आहे. निलंबीत लेखापाल सिद्धेश्वर कैलास सगरे यांनी तक्रारदार गणेश अभिमान भानवसे यांना खोटी व अर्धवट माहिती देवून तक्रारी करण्यास उद्युक्त केल्याचे वरिष्ठ अधिका-यांसमोर कबूल केले आहे. सगरे यांनी निलंबन रद्द करणेसाठी व पाहिजे तेथे पदस्थापना मिळवण्यासाठी केल्याचे कबूल केले आहे. सोलापूर वन विभागाच्या कार्यालयास सोलापूर जिल्हा (युवती विभाग) माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ सोलापूर यांचेकडून दिनांक २ एप्रिल २६ रोजी निलंबीत लेखापाल सिद्धेश्वर सगरे, तक्रारदार गणेश भानवसे व नवनाथ भानवसे हे प्रधान मुख्य वनसंरक्षक सामाजिक वनीकरण विभाग पुणे वनविभागाची बदनामी करत असल्याची तक्रार अर्ज प्राप्त झाला त्या तक्रारीची चौकशी केली असता हे तिघे सोलापूर मधील एका नामांकित हॉटेलमध्ये सोबत वास्तव्यास असल्याचे सीसीटीव्ही फुटेजवरून निदर्शनास आले आहे. यावरून निलंबीत कर्मचारी सगरे, नवनाथ भानवसे प्रधान मुख्य वनसंरक्षक सामाजिक वनीकरण विभाग पुणे व तक्रारदार गणेश अभिमान भानवसे यांनी संगनमताने वनविभागाच्या खोट्या तक्रारी करून वनविभागाची बदनामी करत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच सिद्धेश्वर सगरे यांनी आपले निलंबन रद्द करणेसाठी व हव्या त्या ठिकाणी पदस्थापना मिळवण्यासाठी तक्रारदार गणेश भानवसे यांचेमार्फत शासनाची बदनामी करत असल्यामुळे वनविभागाचे कर्मचारी असलेले निलंबीत लेखापाल सिद्धेश्वर सगरे, व नवनाथ भानवसे यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम १९७९ मधील नियम क्रमांक ३ चा भंग केल्यामुळे विभागीय चौकशी सुरू असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

१२ प्रभाग समित्यांची निवडणूक बिनविरोध

भाजपने एक जागा राष्ट्रवादीला सोडली

हे आहेत बिनविरोध अध्यक्ष

नगर रस्ता वाघोली क्षेत्रीय कार्यालय - अनिल सातव (भाजप), शिवाजीनगर घोले रस्ता क्षेत्रीय कार्यालय - अमृता म्हेत्रे (भाजप), औंध बाणेर क्षेत्रीय कार्यालय - रोहिणी चिमटे (भाजप), कोथरूड बावधन क्षेत्रीय कार्यालय - वासंती जाधव(भाजप), वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय - मंजुश्री खर्डेकर (भाजप), सिंहगड रस्ता - सचिन मोरे (भाजप), धनकवडी कात्रज आंबेगाव क्षेत्रीय कार्यालय - प्रतिभा चोरगे (भाजप), कोंढवा उंड्री क्षेत्रीय कार्यालय- रंजना टिळेकर (भाजप), हडपसर मांजरी क्षेत्रीय कार्यालय - प्रशांत उर्फ मामा तुपे (भाजप), बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय - मनीषा चोरबेले (भाजप), कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय - उजवला यादव (भाजप), विश्रामबाग वाडा क्षेत्रीय कार्यालय - राघवेंद्र मानकर (भाजप), वानवडी क्षेत्रीय कार्यालय - साहिल केदारी (काँग्रेस)

पुणे (दै. आरंभ पर्व)

महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांतील प्रभाग समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी १५ पैकी १२ ठिकाणची निवडणूक बिनविरोध झाली आहे. तीन क्षेत्रीय कार्यालयांमध्ये भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध काँग्रेस अशी निवडणूक होणार आहे. भाजपने युतीधर्म पाळत राष्ट्रवादी काँग्रेसला एक जागा सोडली आहे. प्रभाग समितीची निवडणूक मंगळवारी (ता. २१) होणार आहे.

पुणे महापालिकेत भाजपचे ११९, राष्ट्रवादी काँग्रेसचे २७, काँग्रेसचे १५, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ३, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष १ असे पक्षीय बलाबल आहे. यामध्ये भाजपचे नगरसेवक सर्वाधिक असल्याने १५ पैकी १४ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये भाजपचा अध्यक्ष होणार हे स्पष्ट होते. राष्ट्रवादी काँग्रेसला येरवडा वडगाव शेरी क्षेत्रीय कार्यालयात संधी होती. पण त्याची हद्द बदलण्यात आल्याने तेथेही भाजपचा अध्यक्ष होणार होता. यावरून भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मतभेद निर्माण झाले होते. राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे तक्रार केली होती. त्याच पडसाद उमटल्याने भाजपच्या कोअर कमिटीची बैठक गुरवारी रात्री पार पडली. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेससाठी ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. या क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत भाजपचे ४, काँग्रेसचे ३ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा एक नगरसेवक आहे. भाजपने राष्ट्रवादीला ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय सोडले असले तरी तेथे राष्ट्रवादी काँग्रेस अल्पमतात असल्याने दगाफटका होऊ शकतो.

वानवडी रामटेकडी क्षेत्रीय कार्यालयात काँग्रेसचा उमेदवार विजयी होणार हे निश्चित आहे. पण काँग्रेसने येरवडा-वडगाव शेरी आणि ढोले पाटील रस्ता या ठिकाणीही अर्ज दाखल केला आहे. याठिकाणी तिन्ही ठिकाणी काँग्रेसकडून साहिल केदारी, विशाल मलके आणि वैशाली भालेराव यांनी अर्ज दाखल केले आहेत. वानवडीची निवडणूक बिनविरोध होणार आहे. तर येरवडा क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत भाजपच्या कविता गलांडे विरुद्ध मलके, आणि ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुरेखा कवडे विरुद्ध भालेराव यांच्यात लढत होणार आहे.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६

थोडक्यात पण महत्वाचे

बावधनमध्ये उत्साहात साजरी आंबेडकर जयंती

पुणे (आरंभ पर्व) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विकास प्रतिष्ठान, बावधन व सुजाता महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भीम फेस्टिवल २०२६' मोठ्या उत्साहात पार पडला. १४ एप्रिल २०२६ रोजी आयोजित या सोहळ्यात महामानव, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला पुण्यनगरीच्या प्रथम नागरिक महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे यांनी उपस्थिती लावून जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण करत उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांचा सत्कार बावधन गावचे माजी सरपंच कु वैशालीताई कांबळे, उमेश कांबळे, सुषमाताई कांबळे तसेच युवा उद्योजक निखिल बांदल यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाला बावधन पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल विभूते व त्यांचे सहकारी उपस्थित होते. तसेच अशोक डोंगरे, पश्चिम महाराष्ट्र मंडप असोसिएशनचे अध्यक्ष विजय दगडे पाटील, युवा नेते राहुल दगडे पाटील यांच्यासह बावधन परिसरातील हजारो भीमसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. सर्व उपस्थित मान्यवरांचे विकास प्रतिष्ठानच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. या भव्य सोहळ्याचे आयोजन यशराज उमेश कांबळे यांनी केले होते.

धरण दुरुस्ती कामाची पाहणी; १४.९९ कोटींच्या कामाला गती

चिपळूण (आरंभ पर्व) : डेरवण-राजेवाडी धरणाच्या दुरुस्तीसाठी रु. १४ कोटी ९९ लाखांचा निधी शासन स्तरावर पाठपुरावा करून आमदार शेखर निकम यांनी उपलब्ध करून दिला असून, या कामाची प्रत्यक्ष पाहणी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांसह केली. सन २०२५ पासून सुरू असलेल्या या दुरुस्ती कामाचा आढावा घेताना आमदार निकम यांनी चिपळूण जलसंधारण विभागाचे उपअभियंता सागर भराडे, जिल्हा परिषद सदस्या पूजा निकम, जि. प. सदस्य संजय कदम तसेच ग्रामस्थ यांच्यासमवेत कामाची स्थिती जाणून घेतली. यावेळी उपअभियंता सागर भराडे यांनी धरणाच्या दुरुस्तीबाबत माहिती देताना सांगितले की, धरणाचे काम सध्या जलद गतीने सुरू असून मातीकाम २० मे २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. तसेच गेट वॉल्व बसविण्याचे कामही मे अखेरपर्यंत पूर्ण होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला. यावर्षी साधारण ४० टक्के पाणीसाठा धरणात साठेल, अशी अपेक्षा आहे.

दिव्यांग निधीसाठी दिव्यांगांचे जुन्नर नगर पालिकेला साकडे

जुन्नर (आरंभ पर्व) : जुन्नर येथील श्री राधेश्याम दिव्यांग सशक्तीकरण केंद्र महाराष्ट्र राज्य ग्रुपच्या वतीने जुन्नर शहरातील दिव्यांगांना दरवर्षी प्रमाणे देण्यात येणार सन २०२५ चा पाच टक्के दिव्यांग निधी मिळावा यासाठी निवेदन देण्यात आले आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दिपक चव्हाण व अध्यक्ष अरुण शेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली नगर पालिकेचे मुख्याधिकारी चरण कोल्हे यांची समक्ष भेट घेऊन दिव्यांग निधीसाठी दरवर्षी संघटनेला नगर पालिकेला निवेदन द्यावे लागत असल्याचे सांगण्यात आले. जुन्नर नगर पालिकेच्या वतीने दिव्यांगाचा २०२१ते २५ पर्यंतचा पाच टक्के निधी जमा खर्च लेखी मिळवा. मुकबधीर अतीत्रिव्य दिव्यांगांना व्यवसाय सुरू करण्यासाठी नगर पालिकेच्या हद्दीत दोनशे स्केवर फुट जागा मिळवी. दरवर्षी दिव्यांग पाच टक्के निधी प्रमाणे दिव्यां बांधवांना सहा हजार रुपये मिळतात त्या निधीत वाढ करुन दिव्यांगाच्या बँक खात्यात जमा करण्यात यावा दिव्यांग लोकांना मिटिंग कार्यक्रम व प्रक्षिशण करीता शहरात दिव्यांग भवन मिळावे.दिव्यांग लोकांना घरकुल व जागा मिळणे.दिव्यांग मेळाव्याचे आयोजन करण्यात यावे अशा अनेक विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मुख्याधिकारीचरण कोल्हे यांनी सांगितले की, शहरातील दिव्यांगांना लवकरात लवकर पाच टक्के निधी मध्ये वाढ करून दिव्यांग मेळाव्याचे आयोजन करून वाटप केले जाईल. नगर पालिकेचे नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष नगरसेवक यांच्या उपस्थित कार्यक्रम घेऊन दिव्यांगांचे अडचणी सोडवण्यात येतील तसेच विमा व अरोग्यकार्ड याची नोंदणी करुन लाभ दिला जाईल.

शिवचरित्र प्रसार अश्वमोहीम-२०२६ चा शिवनेरहून शुभारंभ

पुणे येथील दिग्विजय प्रतिष्ठानचा उपक्रम

जुन्नर (दै. आरंभ पर्व)

येथील ऐतिहासिक शिवनेरी किल्ल्यापासून "शिवचरित्र प्रसार अश्वमोहीम – २०२६" या उपक्रमास शुक्रवारी ता.१७ रोजी मोठ्या उत्साहात प्रारंभ करण्यात आला. पुणे येथील दिग्विजय प्रतिष्ठान हॉर्स रायडींग अकॅडमीच्या रजत महोत्सवानिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवचरित्र प्रसार अभियान स्वराज्यातील २५ किल्ल्यांची प्रेरणादायी अश्वमोहीम करणार आहे.

किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी वनविभागाचे सभागृहात शाहीर सुरेश जाधव यांनी आपल्या प्रभावी पोवाड्यांद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य आणि चरित्र सादर केले.यावेळी जुन्नरचे माजी आमदार अतुल बेनके यांनी अश्व मोहिमेतील सहभागी शिलेदारांना मनःपूर्वक शुभेच्छा देत मोहिमेस प्रेरणा दिली. जुन्नर वनविभागाच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. त्यानंतर जुन्नर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर नगरसेवक अनिल रोकडे, पुणे जिल्हा रुरल कंजुमर प्रोडक्ट डिस्ट्रिब्युटर्स असोसिएशन संपर्क प्रमुख व जुन्नर तालुका अध्यक्ष सुनिल शिंदे, पुणे जिल्हा उपाध्यक्ष संदीप शहा, जिल्हा संपर्क प्रमुख सुनिल शिंदे, जुन्नर शहर अध्यक्ष प्रशांत फल्ले, सेक्रेटरी संतोष कर्डिले, ऋषिकेश दुबे, संदेश ढोबळे, जितेंद्र नलावडे, बाळासाहेब गाजरे, राजु कुदळे तसेच जुन्नर तालुका डिलर असोसिएशन संचालक यांनी सर्व शिलेदारांचा सन्मान केला. यानंतर अश्वमोहीम चावंड किल्ल्याकडून जीवधन किल्ल्याकडे प्रस्थान करत पुढील टप्प्यास सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम, शौर्य आणि स्वराज्याच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने आयोजित या अश्वमोहीमेस सर्व स्तरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

परांजपे 'अथश्री'ला २५ वर्षे पूर्ण

पुणे (दै. आरंभ पर्व)

नवे निवासी प्रकल्प साकारण्यात अग्रणी असलेल्या परांजपे स्कीम्स (कन्स्ट्रक्शन) प्रा. लि. या नामांकित विकसकाच्या 'अथश्री' या ज्येष्ठ नागरिक निवास उपक्रमाला २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. भारतातील संघटित ज्येष्ठ नागरिक निवास क्षेत्राच्या घडणीत 'अथश्री'ने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दूरदृष्टीतून सुरू झालेला हा उपक्रम आज सन्मान, स्वावलंबन आणि समुदायाधारित जीवनमूल्यांवर आधारलेली सक्षम व्यवस्था बनली आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्याचे औचित्य साधत, वडोदरा येथे 'अथश्री'च्या ६,००० व्या रहिवाशाला घराचा ताबा देण्याचा सोहळा पार पडला. या कार्यक्रमात रहिवासी, व्यवस्थापन आणि भागीदार सहभागी झाले होते. आज 'अथश्री'चे जाळे सुमारे १६ ज्येष्ठ नागरिक वसाहतींमध्ये विस्तारले असून, विविध शहरांमध्ये ३,००० हून अधिक ज्येष्ठ नागरिकांना निवास व सुविधा दिल्या जात आहेत. कार्यक्रमाची सुरुवात परांजपे स्कीम्सचे अध्यक्ष श्रीकांत परांजपे यांच्या भाषणाने झाली. त्यानंतर व्यवस्थापकीय संचालक शशांक परांजपे यांनी 'अथश्री'चा प्रवास आणि वाढती गरज याविषयी मनोगत व्यक्त केले.

इंग्रजी नोटिसांचा गुंता सोडा, मराठीत संवाद साधा!

जळगाव (दै. आरंभ पर्व)

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून (NHAI) अतिक्रमण हटविण्याबाबत दिल्या जाणाऱ्या नोटिसा इंग्रजीऐवजी मराठी भाषेतून द्याव्यात, अशी आग्रही मागणी सोमवारी जळगावात करण्यात आली. यासंदर्भात प्रकल्प संचालकांना निवेदन देऊन स्थानिक नागरिकांच्या भावना प्रशासनापर्यंत पोहोचवण्यात आल्या. सामान्य नागरिकांची होणारी ओढाताण जळगाव शहर आणि परिसरात महामार्गाच्या कामासाठी किंवा अतिक्रमण निर्मूलनासाठी NHAI मार्फत नागरिकांना वारंवार नोटिसा बजावण्यात येतात. मात्र, या नोटिसा बहुतांश वेळा इंग्रजी किंवा हिंदी भाषेत असतात. प्रशासकीय भाषेतील तांत्रिक शब्दांमुळे सर्वसामान्य नागरिकांना, विशेषतः अल्पशिक्षित व्यापाऱ्यांना या नोटिसांचा अर्थ लावणे कठीण जाते. नेमकी काय कारवाई होणार आहे किंवा आपली बाजू मांडण्यासाठी काय कायदेशीर तरतुदी आहेत, याबाबत नागरिकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण होत आहे. राजभाषेचा आदर व्हावा या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून आशुतोष किशोरसाहेब जाधव यांच्या पुढाकाराने N H AI प्रशासनाला निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, "महाराष्ट्र राज्याची राजभाषा मराठी आहे आणि तसा शासन निर्णयही अस्तित्वात आहे. केंद्राच्या अखत्यारीतील कार्यालयांनी स्थानिकांशी मराठीत संवाद साधणे कायदेशीर व नैतिकदृष्ट्या अपेक्षित आहे . मराठीत नोटिसा मिळाल्यास नागरिकांना कायदेशीर बाबी अचूक समजतील आणि त्यातून उद्भवणारे विनाकारण वाद टाळता येतील."

मान्यवरांची उपस्थिती याप्रसंगी महानगराध्यक्ष विनोद शिंदे, उपमहानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, ज्येष्ठ पत्रकार तथा संपादक राजेंद्र निकम, ललित शर्मा, खुशाल ठाकूर, पंकज चौधरी, राजेश मराठे, दीपक राठोड, राहुल चव्हाण यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासनाने या मागणीची दखल घेऊन सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.

यशवंत विद्यालय खडकवासला येथे १०० सायकलींचे वाटप

खडकवासला (दै. आरंभ पर्व)

खडकवासला गावातील यशवंत विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना रोज दूरवरून पायी शाळेत यावे लागते. या विद्यार्थ्यांच्या अडचणीची दखल घेत कॅनरा बँकेने आपल्या एसआयआर (CSR) निधीतून गरजू विद्यार्थ्यांना तब्बल १०० सायकलींचे वाटप केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासात ही महत्त्वाची मदत ठरणार आहे. या सायकल वाटप कार्यक्रमासाठी कॅनरा बँकेचे क्लस्टर हेड सेल्स मॅनेजर कुलदीप थोरगुले, असिस्टंट मॅनेजर किरण डोईफोडे आणि माजी जिल्हा नियोजन समिती सदस्य अशोक मते यांच्या विशेष प्रयत्नातून हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. हा कार्यक्रम खडकवासला मतदारसंघाचे आमदार भिमराव तापकीर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी नगरसेविका धनश्रीकोल्हे, भाजप मंडलअध्यक्ष विजय मते, भाजप ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष रमेश गायकवाड, प्रदेश सचिव दत्ताभाऊ कोल्हे, उपजिल्हाध्यक्ष अनिल मते, माजी सरपंच सौरभ मते व पुरुषोत्तम मते, स्कूल कमिटी सदस्य विजय मते, भैरवनाथ विठ्ठल मंदिर विश्वस्त मुरलीधर मते तसेच उद्योजक उमेश गोरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक फडतरे, शिक्षकवर्ग आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासात सुलभता येणार असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

आयडीएफसी फर्स्ट बँकेकडून कस्टम ड्युटी पेमेंट सुविधा सुरू

मुंबई (दै. आरंभ पर्व)

आयडीएफसी फर्स्ट बँक ने आज आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक ग्राहकांसाठी विशेष सेवांच्या सुरुवातीची घोषणा केली असून, आईसगेट 2.0 सोबतच्या एकत्रीकरणाद्वारे कस्टम ड्युटी, सेंट्रल एक्साईज आणि सर्व्हिस टॅक्सचे अखंड डिजिटल पेमेंट सक्षम केले आहे. या एकत्रीकरणामुळे ग्राहकांना आईसगेट पोर्टलद्वारे सहजपणे कर भरता येतो आणि आयडीएफसी फर्स्ट बँक च्या रिटेल व कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग प्लॅटफॉर्मद्वारे व्यवहार पूर्ण करता येतात, ज्यामुळे सुरक्षित, कार्यक्षम आणि पूर्णपणे डिजिटल अनुभव मिळतो. या प्लॅटफॉर्मवर रिअल-टाइम व्यवहार पुष्टीकरण, सोपी आणि सुलभ ऑनलाइन प्रक्रिया, तसेच नोंदवही व समायोजनासाठी तत्काळ डाउनलोड करता येणारे चलान उपलब्ध आहे. या लॉन्चबाबत प्रतिक्रिया देताना, आयडीएफसी फर्स्ट बँकेचे रिटेल लायबिलिटीज विभागाचे प्रमुख श्री. आशिष सिंग म्हणाले, "कस्टम ड्युटी पेमेंट्स हे व्यापाराच्या गतीसाठी आणि व्यवसायाच्या सातत्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. आईसगेट 2.0 वर लाइव्ह झाल्यामुळे आम्ही आयातदार, निर्यातदार आणि व्यवसायांना प्रत्यक्ष कर आणि जीएसटीपेमेंटप्रमाणेच सोप्या व विश्वासार्ह पद्धतीने त्यांच्या जबाबदाऱ्या डिजिटल माध्यमातून पूर्ण करण्यास सक्षम करत आहोत.

फिजिक्सवालाच्या विद्यार्थ्यांनी मिळवले अभूतपूर्व यश

पुणे (दै. आरंभ पर्व)

आजचा दिवस शिक्षण क्षेत्रातील कंपनी फिजिक्सवाला साठी उत्सवाचा ठरला, कारण सीबीएसई इयत्ता १० वी बोर्ड परीक्षा २०२६ मध्ये या संस्थेचे अनेक विद्यार्थी उच्च गुण मिळवून चमकले; यामध्ये १०० टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचाही समावेश होता. अव्वल कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये पंजाबमधील फाझिल्का येथील वैभव अरोरा, गुजरातच्या अहमदाबाद येथील अमोलिक पंडिता आणि ओडिशाच्या भुवनेश्वर येथील आयुषमान मोहपात्रा यांचा समावेश होता. या तिघांनीही १०० टक्के गुण मिळवून देशभरात अव्वल क्रमांक पटकावला. याव्यतिरिक्त, फिजिक्सवाला च्या तंत्रज्ञान-सज्ज ऑफलाइन केंद्रांपैकी एक असलेल्या ' फिजिक्सवाला विद्यापीठ'ने पुण्यात एका सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. सीबीएसई इयत्ता १० वी बोर्ड परीक्षा २०२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शहरातील फिजिक्सवाला विद्यार्थ्यांचा या समारंभात सत्कार करण्यात आला. उच्च गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये ऋतुजा संदीप कानसे (९९%), अनुराग आनंद शास्त्री (९८.६०%) आणि यशिका मंगलानी (९७.६०%) यांचा समावेश होता.

नाशिकमध्ये राष्ट्रीय गौरव पुरस्कार सोहळा संपन्न

पुणे (दै. आरंभ पर्व)

आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित "राष्ट्रीय गौरव पुरस्कार 2026" हा भव्य आणि प्रेरणादायी सोहळा नाशिक येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. महिला उद्योजक आणि युवा उद्योजकांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाने उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले.

या सोहळ्याला प्रमुख पाहुण्या म्हणून मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री स्वरा राजपूत यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. त्यांच्या प्रेरणादायी उपस्थितीमुळे नवउद्योजकांना नवी दिशा आणि आत्मविश्वास मिळाल्याचे पाहायला मिळाले.

संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे मुख्य संयोजक गणेश रामदास विटकर यांच्या कुशल नेतृत्वाखाली हा सोहळा यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमात दिलीप जाधव, गणेश मोढवे यांच्यासह विविध क्षेत्रातील उद्योजक, कृषी तज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना "राष्ट्रीय गौरव पुरस्कार 2026" प्रदान करण्यात आला. गायन क्षेत्रात विशेष योगदानासाठी गायत्री अमोघ कुलकर्णी यांना "सुरेल आवाजाची सृजनहार" या विशेष गौरवासह पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या मधुर आणि प्रभावी गायनामुळे त्यांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले असून त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अहमदाबाद येथे गायत्री कुलकर्णी यांना संगीत क्षेत्रातील अनेक दिग्गज आणि आयोजकांचा भक्कम पाठिंबा लाभला आहे. यामध्ये गुरुपाल सिंग, संजय तन्ना, वर्षा कुलकर्णी, भावेश व्यास, सीमा पटेल, हार्दिक सोनी, संजीव कीर्तणे आणि नयना रावल यांचा समावेश आहे. या सर्वांच्या सहकार्यामुळेच गायत्री यांच्या यशाला अधिक बळ मिळाल्याचे नमूद करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमात उत्कृष्ट नियोजन, आकर्षक सादरीकरण आणि प्रेरणादायी वातावरण यामुळे उपस्थितांना अविस्मरणीय अनुभव मिळाला. आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन च्या या उपक्रमामुळे समाजातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना नवसंजीवनी मिळाली असून भविष्यात अशा उपक्रमांची व्याप्ती अधिक वाढावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

थोडक्यात पण महत्वाचे

बोपोडीत रंगली संयुक्त जयंतीची सांस्कृतिक मैफल

पुणे (आरंभ पर्व) : छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त बोपोडी येथे विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.) यांच्या वतीने आयोजित केलेल्या संयुक्त जयंती महोत्सवात आज शाहीरी, लोकसंगीताच्या माध्यमातून महामानवांच्या विचारांचा जागर करण्यात आला. शाहीर पृथ्वीराज माळी यांच्या बहारदार कार्यक्रमात पारंपारिक व आधुनिक सादरीकरणांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अधिष्ठाता डॉ. विजय खरे, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणेचे अध्यक्ष उपमहापौर परशुराम वाडेकर, रिपब्लिकन पक्षाचे अविनाश कदम, उमेश कांबळे, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, सामाजिक कार्यकर्ते शैलेन्द्र कांबळे आदि मान्यवर उपस्थित होते.



चैत्र अमावस्येनिमित्त चंदन उटी व मोगरा महोत्सव उत्साहात साजरा

पुणे (आरंभ पर्व) : धायरीतील श्री पद्मावती देवी मंदिर देवस्थान ट्रस्ट आणि समस्त धायरी ग्रामस्थांच्या वतीने चैत्र अमावस्येनिमित्त सार्वजनिक चंदन उटी व मोगरा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शुक्रवार, दिनांक १७ एप्रिल रोजी या उत्सवानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ह.भ.प. चंद्रकांत महाराज वांजळे यांची किर्तनसेवा पार पडली. सकाळी श्री पद्मावती देवी व श्री कमळजाई देवीला अभिषेक पूजा करण्यात आली. त्यानंतर देवीला सुवासिक चंदन उटी लावण्यात आली. सायंकाळी देवीला मोगऱ्याची फुले अर्पण करण्यात आली. यानंतर आरती व जोगवा , भजन आणि महाप्रसाद असे कार्यक्रम पार पडले. यावेळी श्रीरंग चव्हाण पाटील, नगरसेवक काकासाहेब चव्हाण, माजी नगरसेविका अश्विनी पोकळे, स्वाती पोकळे, किशोर पोकळे, संदीप चव्हाण, भाऊसाहेब पोकळे, गुलाब पोकळे, नामदेव भुरूक, संजय पोकळे, सोमनाथ रायकर, उत्तम लायगुडे, गणेश पोकळे, बाबुराव पोकळे, रमेश पोकळे, शिवाजी पोकळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

तृप्ती डिमरी व्हिक्टोरिया सीक्रेट इंडिया' ची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती

पुणे (आरंभ पर्व) : अपॅरल ग्रुप, एक अग्रगण्य जागतिक फॅशन आणि जीवनशैली रिटेल समूहने तृप्ती डिमरीची व्हिक्टोरिया सीक्रेट इंडियाची पहिली ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करून एका महत्त्वपूर्ण नव्या अध्यायाची घोषणा करत आहे. आज, व्हिक्टोरिया सीक्रेट आणि पिंक या बाजारपेठेतील आघाडीच्या ब्रँड्सचा समावेश असलेल्या आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी, आनंद निर्माण करण्यासाठी व आकर्षकतेचा उत्सव साजरा करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या व्हिक्टोरिया सीक्रेटने, भारतात त्यांच्या 'समर सिग्नेचर' मोहिमेच्या शुभारंभाची घोषणा केली. या मोहिमेत प्रसिद्ध भारतीय अभिनेत्री आणि नवीन स्थानिक ब्रँड ॲम्बेसेडर, तृप्ती डिमरी प्रमुख भूमिकेत आहे. 'समर सिग्नेचर' कलेक्शनमध्ये आरामदायक आणि परिधान करण्यास सोपी अंतर्वस्त्रे (लॉन्जरी) आणि स्लीपवेअरचा समावेश आहे, ज्यामध्ये ब्रँडची प्रतिष्ठित, पारंपरिक पट्टेदार रचना (स्ट्राइप डिझाइन) आहे. या कलेक्शनची सहजता आणि ग्लॅमर, तसेच तृप्तीच्या सहज आत्मविश्वासाने प्रेरित होऊन, ही नवीन मोहीम 'समर सिग्नेचर' शैलींचे सार दर्शवते. या कलेक्शनमध्ये सिग्नेचर स्ट्राइप लोगो टी-शर्ट, वायरलेस ब्रा आणि सिग्नेचर स्ट्राइप लोगो पॅन्टीचा समावेश आहे, जे रोजच्या आरामासाठी उत्तम आहेत.

आसूस तर्फे 'ड्रॉप झोन' नेटवर्कचा २२ स्टोअर्समध्ये विस्तार

पुणे (आरंभ पर्व) : आपल्या 'ड्रॉप झोन' उपक्रमाच्या यशस्वी शुभारंभानंतर आसूस इंडिया ने देशभरातील आपल्या आणखी २२ स्टोअर्समध्ये हा उपक्रम सुरु करत या उपक्रमाच्या विस्तारीकरणाची घोषणा केली आहे. देशभरातील ग्राहकांना खरेदीपश्चात सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवेला पाठबळ देण्याबाबतची आपली वचनबद्धता कंपनीने या उपक्रमातून आणखी मजबूत केली आहे. ग्राहकांचा उत्पादन वापराचा अनुभव अधिक उंचावण्यावर भर देत 'ड्रॉप झोन' उपक्रम ग्राहकांना त्यांचे लॅपटॉप दुरुस्तीसाठी 'आसस एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स' मध्ये जमा करण्याची सुविधा प्रदान करत आहे. यामुळे ग्राहकांना खास सर्व्हिस सेंटर्सवर जाण्याची गरज उरलेली नाही. विशेषतः उदयोन्मुख बाजारपेठांमधील उपलब्धता, दुरुस्तीसाठी लागणारा वेळ आणि सेवेतील स्पष्टता यासारख्या ग्राहकांच्या मुख्य समस्या सोडवण्यासाठीची आससची वचनबद्धता या विस्तारातून प्रकट होते. ज्यात श्वास घेण्यायोग्य, स्पर्शाला थंड वाटणारे पॅडिंग आणि अत्यंत मऊ विकिंग फॅब्रिक आहे, जे झटपट सुकते आणि दिवसापासून रात्रीपर्यंत वापरता येते.

अध्यक्षपदी सचिन मोरे यांची बिनविरोध निवड

समाविष्ट गावातील विकासाला गती देण्याचा सचिन मोरे यांचा निर्धार

पुणे (दै. आरंभ पर्व)

सिंहगड रोड परिसरातील राजकीय घडामोडींमध्ये महत्त्वाची मानली जाणारी प्रभाग समिती अध्यक्षपदाची निवड नुकतीच पार पडली असून, प्रभाग क्रमांक ३५ चे नगरसेवक सचिन रावसाहेब मोरे यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक नागरिकांकडूनही सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

सिंहगड रोड हा पुण्यातील झपाट्याने वाढणारा आणि समाविष्ट गावांचा मोठा परिसर मानला जातो. या भागातील पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, मलनिस्सारण तसेच नागरी सुविधा यांसंदर्भातील प्रश्न मोठ्या प्रमाणावर आहेत. अशा परिस्थितीत अनुभवी आणि कार्यक्षम नेतृत्व म्हणून सचिन मोरे यांच्या निवडीकडे अपेक्षेने पाहिले जात आहे.

निवडीनंतर बोलताना मोरे यांनी आपल्या भावना व्यक्त करत सांगितले की, "राजकारणामध्ये संयम ठेवला तर प्रत्येकाला योग्य संधी मिळते. त्यासाठी पक्षनिष्ठा, सातत्य आणि कर्तव्यदक्षता महत्त्वाची असते. पक्षाने माझ्यावर टाकलेला विश्वास मी निश्चितपणे सार्थ ठरवेन." त्यांनी पुढे सांगितले की, सर्व घटकांना सोबत घेऊन विकासकामांना प्राधान्य देणे हेच आपले प्रमुख ध्येय राहणार आहे

सचिन मोरे यांनी भारतीय जनता पक्षामध्ये विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. पूर्वी त्यांनी विधानसभा पातळीवरील महत्त्वाच्या पदांवर काम केले असून, सध्या ते शहर उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. प्रभाग क्रमांक ३५ मधून पक्षाच्या उमेदवारीवर त्यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत आपली राजकीय ताकद सिद्ध केली होती.

त्यांच्या कामाचा आणि संघटन कौशल्याचा विचार करून पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास दाखवत सिंहगड रोड प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. यावेळी त्यांनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ आणि आ. भीमराव तापकीर, महापौर मंजुषा नागपुरे, सभागृह नेते गणेश बिडकर, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, शहराध्यक्ष धीरज घाटे यांसह सर्व वरिष्ठ नेत्यांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले.

पुढील कार्यकाळाबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना मोरे यांनी सांगितले की, समाविष्ट गावांसाठी स्वतंत्र आणि परिणामकारक विकास आराखडा (रोड मॅप) तयार केला जाणार आहे. प्रत्येक प्रभागात प्रत्यक्ष भेटी देऊन स्थानिक समस्या जाणून घेतल्या जातील आणि त्या सोडवण्यासाठी प्राधान्याने काम केले जाईल. रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा सुधारणा, स्वच्छता आणि मलनिस्सारण व्यवस्था या मूलभूत सुविधांवर विशेष भर दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, प्रभागातील सर्व लोकप्रतिनिधी, नागरिक आणि सामाजिक संस्थांशी समन्वय साधून काम करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. "जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणे आणि त्यांच्या समस्या सोडवणे हीच माझी प्राथमिकता असेल," असे सांगत त्यांनी नागरिकांना विश्वास दिला.

सचिन मोरे यांच्या बिनविरोध निवडीमुळे सिंहगड रोड परिसरातील विकासकामांना नवसंजीवनी मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात असून, आगामी काळात त्यांच्या कार्यशैलीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

डीएस ग्रुपची पहिली वहिली दूरचित्रवाणी जाहिरात सादर

पुणे (दै. आरंभ पर्व)

अग्रगण्य वेगवान ग्राहक वस्तू (एफएमसीजी) समूह आणि बहुव्यवसायिक कॉर्पोरेशन असलेल्या धर्मपाल सत्यपाल समूह (डीएस ग्रुप) अंतर्गत लोकप्रिय ब्रँड कॅच सॉल्ट अँड स्पायसेसने कॅच प्रीमियम आयोडाइज्ड पिंक रॉक सॉल्टसाठी आपली पहिली वहिली दूरचित्रवाणी जाहिरात (टीव्हीसी) सादर केल्याची घोषणा केली आहे. डेंट्सू क्रिएटिव्ह वेबचटणी यांनी संकल्पित आणि निर्मित केलेली ही मोहीम डीएस समूहाच्या संवादाला मसाले आणि स्प्रिंकलर्स श्रेणीपलीकडे विस्तार देते. ही जाहिरात मीठ श्रेणीतील डीएस समूहाच्या उत्पादनाबाबत भक्कम जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आली असून, ती दूरचित्रवाणी आणि डिजिटल माध्यमांसह समाजमाध्यमे आणि ओटीटीवर प्रसारित होणार आहे,

ज्यामुळे लक्ष्यित प्रेक्षकांपर्यंत व्यापक पोहोच सुनिश्चित होईल. ही जाहिरात शेजारच्या खेळाच्या मैदानातील हलक्याफुलक्या आणि आपुलकीच्या प्रसंगावर आधारित आहे, जिथे दोन माता आणि त्यांची मुले संवाद साधताना दिसतात. या कथानकाचा केंद्रबिंदू एक लहान मुलगी आहे, जी आत्मविश्वासाने कॅच प्रीमियम आयोडाइज्ड पिंक रॉक सॉल्टची उत्पत्ती आणि फायदे समजावून सांगते आणि सहज संवादातून उत्पादनाच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकते.

रिंगरोड बाधित शेतकऱ्याचा प्रशासना विरोधात आक्रोश

पुणे/मुळशी (दै. आरंभ पर्व)

मुळशी तालुक्यातील रिहे येथील एका रिंगरोड बाधित पशुपालक शेतकऱ्यावर प्रशासनाने पोलीस बळाचा वापर करून अन्याय केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असतानाही, कोणताही मोबदला न देता शेतकऱ्याचा गोठा आणि शेड जमीनदोस्त करण्यात आल्याने खळबळ माजली आहे.

रिहे गावचे रहिवाशी विलास रामचंद्र शिंदे यांची सर्वे नंबर ५७८/४ मधील जमीन रिंगरोडसाठी बाधित झाली आहे. गेल्या ७०-८० वर्षांपासून शिंदे कुटुंब या जमिनीची मशागत करत असून सातबारावर त्यांचे नाव आहे. या जागेत त्यांचे आरसीसी घर, गोठा आणि कुक्कुटपालन शेड होते. मात्र, काही लोकांनी घेतलेल्या हरकतीमुळे हे प्रकरण सध्या न्यायालयात आहे. विशेष म्हणजे, आतापर्यंतचे

भर उन्हात जनावरे रस्त्यावर!

न्यायालयाचे सर्व निकाल शिंदे यांच्या बाजूने लागले आहेत. विलास शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, "प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने अद्याप कोणताही मोबदला मिळाला नाही. मोबदला मिळाल्याशिवाय कुटुंब आणि १५ गाईना घेऊन कुठे जायचे, असा प्रश्न असतानाच १८ एप्रिल रोजी महसूल विभागाने पोलीस बळाचा वापर केला. कोणतीही पूर्वसूचना किंवा मुदत न देता माझे बांधकाम पाडण्यात आले. गाईंना भर उन्हात बाहेर काढले असून चारा आणि सामानाची मोठी नासधूस झाली आहे."

प्रांत अधिकाऱ्यांनी आधी मोबदला देण्याचे आश्वासन दिले होते, मात्र ते न पाळता कारवाई केल्याचा आरोप शिंदे यांनी केला आहे. आता २० एप्रिल रोजी राहते घरही पाडण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. "दोन दिवसांची मुदत मागूनही प्रशासनाने ऐकले नाही. आता आम्ही राहायचे कुठे आणि जनावरांना काय चारायचे? आमचा उदरनिर्वाह कसा चालणार?" असा टाहो शिंदे यांनी फोडला आहे. या कारवाईमुळे मुळशी तालुक्यातील शेतकरी वर्गात प्रशासनाविरोधात संतापाची लाट उसळली आहे. आता २० तारखेच्या कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले असून, शिंदे कुटुंबाला न्याय मिळणार का? हा प्रश्न उपस्थित होत आहे.

पुण्यात महात्मा बसवेश्वरांची ८९५ वी जयंती उत्साहात साजरी

पुणे (दै. आरंभ पर्व)

साडेतीन मुहूर्तांपैकी पवित्र अक्षय तृतीया निमित्त लिंगायत धर्मियांचे आराध्य दैवत, विश्वगुरू जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची ८९५ वी जयंती महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा, पुणे शहर समितीच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम पुणे येथील महाराणा प्रताप बाग येथे पार पडला.

जयंतीनिमित्त महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशूराम वाडेकर, कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने, माजी आमदार रवींद्र धंगेकर, प्रभाग क्रमांक १५ चे नगरसेवक राघवेंद्र उर्फ बाप्पू मानकर, स्वरदा बापट, कुणाल टिळक, स्वप्नाली पंडित,पीएमपीएलचे अध्यक्ष अजय खेडेकर, माजी नगरसेवक संजय बालगुडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच लिंगायत समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. महात्मा बसवेश्वरांनी "सर्व मानव समान आहेत" हा ठाम संदेश समाजाला दिला. त्यांनी जन्मावर आधारित उच्च-नीच भेद नाकारून "कायकवे कैलास" (प्रामाणिक श्रम हीच पूजा) ही संकल्पना मांडली. कोणतेही काम लहान किंवा मोठे नसून प्रत्येकाने प्रामाणिकपणे श्रम करून स्वाभिमानाने जगावे, हा त्यांचा मूलभूत विचार होता. जातीभेद आणि अस्पृश्यता दूर करण्यासाठी त्यांनी 'अनुभव मंटप' स्थापन करून सर्व जाती-धर्मातील लोकांना समान व्यासपीठ उपलब्ध करून दिले. बाराव्या शतकात स्थापन झालेले 'अनुभव मंटप' हेच खऱ्या अर्थाने जागतिक लोकशाहीचे पहिले मंदिर मानले जाते. त्यांनी आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देत सामाजिक बंधने मोडण्याचा प्रयत्न केला.

समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित त्यांचे विचार आजही समाजासाठी मार्गदर्शक ठरत आहेत.

यावेळी महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा प्रदेश समितीचे सरचिटणीस बाळासाहेब होनराव, कोषाध्यक्ष सुरेंद्र शेठ गाढवे, पंढरीनाथ लांडगे, रवींद्र होडगे, माणिक कस्तुरे, विलास हापसे, प्रकाश गुळवे, सुधाकर हलगणे तसेच पुणे शहर समितीचे अध्यक्ष सोमेश्वर वाडी यांच्यासह शिवानंद पाटील, अनिल भत्ते, राजू मिटकरी, रविकिरण पाटील, दत्तात्रय लांडगे, संदीप हलगणे, धोंडप्पा नंदे, गणेश हिंगमिरे, रोहन जठार, शुभम गाढवे, सिद्राम स्वामी, सिद्धू गोगी, हरिचंद्र केंदळे, दीपक नवाळे, संतोष केंजळे, शिवलिंग होनराव, बसवराज हंदराळे, संग्राम मलेश, किशोर वारीकर, संतोष गुळमिरे, उत्कर्ष लांडगे, इराण्णा पडशेट्टी, अविनाश उरवणे, तुषार पुस्तके, उमेश संगमनेरकर, सागर मांडे, ओंकार शेटे, अनिल स्वामी आदी उपस्थित होते.

समृद्ध भारताच्या निर्मितीत युवकांची भूमिका महत्त्वाची : दीपक करंजीकर

पुणे (दै. आरंभ पर्व)

समृद्ध भारत घडवण्यासाठी केवळ शासनाच्या योजना पुरेशा नाहीत, तर प्रत्येक नागरिकाने स्वतःची जबाबदारी ओळखून प्रामाणिकपणे योगदान देणे अत्यावश्यक आहे. तरुणांनी केवळ नोकरीकडे न पाहता रोजगारनिर्मितीकडे वळावे, नवीन संधी शोधाव्यात आणि देशाच्या विकासात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रख्यात अर्थकारण व समाजकारण अभ्यासक दीपक करंजीकर यांनी केले. नागरिक सोशल फाउंडेशन आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले "समृद्ध भारत आणि मी" या विषयावरील व्याख्यानात करंजीकर बोलत होते, या प्रसंगी नागरिक सोशल फाउंडेशनचे संचालक प्रितम थोरवे,अमेय सप्रे, शेखर यादव, वक्ता विभागाचे प्रमुख दीपक मेहेंदळे आदि मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना करंजीकर म्हणाले, भारताची समृद्धी

ही केवळ आर्थिक बाबींवर अवलंबून नसून, सांस्कृतिक मूल्ये, नैतिकता, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक एकता या घटकांवरही तितकीच अवलंबून असल्याचे त्यांनी नमूद केले. डिजिटल युगात भारत वेगाने प्रगती करत असताना, त्या प्रगतीला योग्य दिशा देण्याची जबाबदारी युवकांवर आहे. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्न विचारले. प्रश्नोत्तरांच्या सत्रात करंजीकर यांनी विद्यार्थ्यांच्या शंका समाधानकारक पद्धतीने दूर केल्या. यामुळे कार्यक्रम अधिक संवादात्मक आणि प्रभावी ठरला.

मुक्ताईनगरच्या खडसे महाविद्यालयात 'बुद्धिबळ प्रशिक्षण शिबिरा'चा श्रीगणेशा

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासावर भर

मुक्ताईनगर (दै. आरंभ पर्व)

विद्यार्थ्यांच्या तर्कशक्तीला आणि बौद्धिक कौशल्याला व्यासपीठ मिळवून देण्यासाठी येथील श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालयात २० तारखेपासून '१५ दिवसीय बुद्धिबळ प्रशिक्षण शिबिराचे' शानदार आयोजन करण्यात आले आहे. प्राचार्य प्रो. डॉ. एच. ए. महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि क्रीडा संचालक प्रा. डॉ. प्रतिभा ढाके यांच्या पुढाकारातून क्रीडा विभागामार्फत हा स्तुत्य उपक्रम राबवण्यात येत आहे. तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून मिळणार धडे या शिबिरासाठी अनुभवी बुद्धिबळ प्रशिक्षक प्रशांत राणे हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत. शिबिराच्या पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांना खालील तांत्रिक बाबींचे सखोल ज्ञान दिले जाणार आहे. पटावरील मोहऱ्यांची मांडणी व त्यांच्या चाली. ओपनिंग (सुरुवात), मिडल गेम आणि एंड गेमचे प्रभावी नियोजन.'फोर्क', 'पिन', 'स्क्यूअर' यांसारख्या टॅक्टिक्सचे प्रात्यक्षिकासह शिक्षण. प्रतिस्पर्ध्याला कोंडीत पकडून मात कशी करावी याचे कौशल्य.

> **"या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेत वाढ होऊन त्यांच्यात समस्या सोडवण्याची कौशल्ये विकसित होतील. भविष्यातही अशा प्रकारचे वैविध्यपूर्ण उपक्रम महाविद्यालयात राबवले जातील."**
>
> **— प्राचार्य प्रो. डॉ. हेमंत महाजन**

बुद्धिबळ हा केवळ खेळ नसून तो मानसिक व्यायामाचा उत्तम प्रकार आहे. या शिबिराद्वारे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, संयम, निर्णयक्षमता आणि विश्लेषणात्मक विचार विकसित करण्यावर भर दिला जात आहे. प्रशिक्षणासोबतच विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी सराव सामने आणि मिनी स्पर्धा घेतल्या जाणार असून, यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसांनी गौरविण्यात येईल. पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद महाविद्यालयाच्या या अभिनव उपक्रमाचे विद्यार्थी व पालकांकडून मोठ्या प्रमाणात स्वागत होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अशा प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध झाल्याने क्रीडा वर्तुळात समाधान व्यक्त केले जात आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

थोडक्यात पण महत्वाचे

इयत्ता १०वीच्या परीक्षेत अमनोरा स्कूल ने नोंदविले उत्तुंग यश

पुणे (आरंभ पर्व) : अमनोरा स्कूलने पुन्हा एकदा शैक्षणिक उत्कृष्टतेचा ठसा उमटवत दहावी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. शाळेने 100% निकाल साध्य केला असून विद्यार्थ्यांनी सर्व विषयांत उच्च गुण मिळवले आहेत. शैक्षणिक यशामध्ये आघाडीवर असलेले शाळेचे टॉपर विद्यार्थी असे आहेत: करण ओबेरॉय यांनी उल्लेखनीय 99% गुण मिळवले, त्यानंतर रुची शिरशाट यांनी 98.8% आणि जस्मिता कर यांनी 98.6% गुण मिळवले. त्यांचे यश हे सातत्यपूर्ण मेहनत, दृढनिश्चय आणि संस्थेकडून मिळालेल्या भक्कम शैक्षणिक पाठबळाचे प्रतिबिंब आहे. शाळेच्या यशाचे श्रेय सुबक अभ्यासक्रम, सातत्यपूर्ण मूल्यमापन प्रणाली आणि शिक्षकांच्या निष्ठावान प्रयत्नांना जाते. अमनोरा स्कूल विद्यार्थ्यांमध्ये संकल्पनात्मक समज, चिकित्सक विचारशक्ती आणि सर्वांगीण विकास घडविण्यावर भर देते. या अभिमानास्पद प्रसंगी संचालक प्राचार्य मीरा नायर, मुख्याध्यापिका अमृता गंगवाल आणि इयत्ता 9 व 10 समन्वयक गीता शिवकुमार यांनी संपूर्ण शिक्षकवर्गासह विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक केले तसेच पालक आणि शिक्षकांच्या सहकार्याबद्दल आभार मानले. "ही उपलब्धी आमच्या विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे आणि आमच्या शिक्षकांच्या समर्पणाचे प्रतिबिंब आहे, ज्यांनी त्यांना सातत्याने मार्गदर्शन आणि समर्थन दिले आहे," असे शाळा प्रशासनाने सांगितले. इयत्ता 11वीचे प्रवेश आता सुरू असून मर्यादित जागा उपलब्ध आहेत. शाळा इच्छुक विद्यार्थ्यांना आपल्या गतिमान शैक्षणिक समुदायाचा भाग होण्यासाठी आमंत्रित करते. हे उत्कृष्ट निकाल अमनोरा स्कूलच्या उत्कृष्टतेच्या बांधिलकीला अधोरेखित करतात आणि भावी पिढ्यांना यशासाठी प्रेरित करतात.

महिलांना नेतृत्व मिळवून देण्यासाठी गोदरेज अग्रोव्हेटची गुंतवणूक

बारामती (आरंभ पर्व) : अन्न आणि कृषी क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या गोदरेज अग्रोव्हेट लिमिटेड कंपनीने नेहमीच संशोधन आणि विकासावर भर दिला आहे. नुकतेच गोदरेज अग्रोव्हेट कंपनीने विमेन इन अग्रीकल्चर समिटच्या तिस-या आवृत्तीमध्ये नव्या कार्यक्रमाची घोषणा केली आहे. कंपनीकडून 'दिशा' या नावाने महिला करिअर प्रवेगक कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. कृषी क्षेत्रामध्ये सर्वसमावेशक आणि भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज असलेली टॅलेंट इकोसिस्टम निर्माण करण्याप्रती आपली वचनबद्धता सिद्ध करण्यासाठी कंपनीने हे पाऊल उचलले आहे. कृषी क्षेत्रातील महिलांच्या व्यावसायिक प्रगतीला वेग देणे, त्यांना नेतृत्व पदांसाठी सक्षम करणे, हा यामागील उद्देश आहे. गोदरेज अग्रोव्हेटचा सीएसआर उपक्रम म्हणून दिशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम 'कॅम्पस-टू-कॉर्पोरेट फिनिशिंग स्कूल' म्हणून डिझाइन करण्यात आला आहे. कृषी आणि तत्सम शाखांमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थिनींची रोजगारक्षमता वाढवणे हा याचा मुख्य उद्देश आहे. हा कार्यक्रम विक्री कौशल्ये, संवाद कौशल्ये आणि व्यावसायिक सज्जता यांसारख्या उद्योगासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांवर भर देतो. या उपक्रमांमुळे विद्यार्थिनींना औपचारिक करिअरमध्ये पाऊल ठेवणे सोपे होईल, असा कंपनीचा ठाम विश्वास आहे. 'वनएमएनबी फाऊंडेशन' आणि 'इक्का लर्निंग फाउंडेशन' यांच्या सहकार्याने राबवल्या जाणा-या या उपक्रमाने आतापर्यंत आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटकमधीन २७६हून अधिक विद्यार्थिनींना प्रशिक्षित केले आहे. यातील अनेक विद्यार्थिनींनी नामांकित संस्थांमध्ये नोकरीच्या संधी मिळवल्या आहेत. महिलांना कृषी क्षेत्रात सक्षम करण्याच्या दिशेने ही कंपनीची महत्त्वपूर्ण कामगिरी समजली जाते.

यात्रेत धावले ३५० बैलगाडे

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : राजगुरूनगर येथील भोपळबुवा आणि सिद्धेश्वर महाराजांच्या यात्रेनिमित्त भरविण्यात आलेल्या बैलगाडा शर्यतीत ३५० बैलगाडे धावले. शर्यतीत अव्वल आणि फायनल स्पर्धेत अव्वल येणाऱ्या गाड्यांसाठी मोठ्या रकमेची बक्षिसे तसेच वस्तु स्वरूपात बक्षिसे देण्यात आली. फायनल साठी घाटात मोठी गर्दी झाली होती. सिद्धेश्वर मंदिर परिसरात असलेल्या बैलगाडा घाटावर दोन दिवस शर्यती पार पडल्या. यावेळी शौकीनांनी मोठी गर्दी केली होती. पंचक्रोशीतून अनेक बैलगाडा मालक आणि नागरीक यावेळी उपस्थित होते. गावचे मांडव डहाळे, शोभायात्रा काढून यात्रेची सुरुवात झाली. शनिवारी रात्री पद्मश्री रघुवीर खेडकर यांचा लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम झाला. अशी माहिती देवस्थान समिती अध्यक्ष आणि जिल्हा सहकारी बोर्डाचे अध्यक्ष हिरामण सातकर यांनी दिली. बैलगाडा शर्यतीच्या फायनल साठी ज्येष्ठ नेते नानासाहेब टाकळकर, नरेंद्र थिगळे, जिल्हा परिषदेचे गटनेते आणि बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, माजी सभापती विनायक घुमटकर, संचालक अशोक राक्षे, सुधीर भोमाळे, पंचायत समितीचे उपसभापती मंगेश सावंत, राजगुरुनगर बँकेचे अध्यक्ष सागर पाटोळे, राजगुरुनगरचे नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ व त्यांचे सर्व सहकारी तसेच खंडेराव थिगळे, समीर आहेर, अशोक दुगड आदी उपस्थित होते.

शिवराज काळभोर यांना अमेरिका विद्यापिठाची मानद डॉक्टरेट उपाधी

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : लोणी काळभोर येथील युवा समाजसेवक शिवराज काळभोर यांना अमेरिका आंतराष्ट्रीय विद्यापीठाची मानद डॉक्टरेट उपाधी मिळाल्याने लोणी काळभोर तसेच पंचक्रोशीतील नागरीकांमधुन तसेच युवा वर्गातुन त्यांच्यावर अक्षरशः शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. लहान वयापासून समाजसेवेत उल्लेखनीय कार्य करत युवकांमध्ये भक्कम ओळख निर्माण करणारे युवा समाजसेवक शिवराज मनोज काळभोर यांना "अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी"तर्फे समाजसेवा क्षेत्रातील मानद उपाधी प्रदान करण्यात आली. हा सन्मान काल एका विशेष समारंभात प्रदान करण्यात आला.काळभोर यांनी सामाजिक उपक्रम, युवक सक्षमीकरण आणि समाजविकासासाठी सातत्याने केलेल्या कामगिरीमुळे अनेक पुरस्कारही मिळवले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली विविध सामाजिक उपक्रम राबवले जात असून युवकांमध्ये त्यांची चांगली पकड निर्माण झाली आहे.

नऱ्हेच्या विकासाला वेग : ३४.९० कोटींच्या कामांचा शुभारंभ

पुणे (दै. आरंभ पर्व)

झपाट्याने वाढणाऱ्या नऱ्हे परिसराच्या विकासाला नवे बळ देणाऱ्या अमृत 2.0 योजनेअंतर्गत 34.90 कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचा रविवारी उत्साहात शुभारंभ करण्यात आला. खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा पार पडला. या कामांमुळे नऱ्हे परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नऱ्हे परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असून त्यानुसार मूलभूत सुविधांवर ताण वाढला आहे. विशेषतः मलनिस्सारण व्यवस्थेच्या अपुऱ्या सुविधांमुळे नागरिकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर अमृत 2.0 योजनेतून मलवाहिनी प्रकल्पाला प्राधान्य देण्यात आले आहे. या टप्प्यात कुटे मळा ते हिरा पन्ना स्वीट्स, वेताळ बुवा चौक ते JSPM कॉलेज तसेच अभिनव परिसर ते नंदनवन सिटी या भागांमध्ये मलवाहिनीची कामे हाती घेण्यात आली आहेत. या प्रकल्पामुळे सांडपाणी व्यवस्थापन सुधारून परिसरात स्वच्छता राखण्यास मोठी मदत होणार आहे. तसेच नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित समस्या कमी होण्यासही हातभार लागणार आहे. यावेळी आमदार भीमराव (अण्णा) तापकीर म्हणाले, "नऱ्हे परिसराचा वेगाने विकास होत असून नागरिकांना दर्जेदार सुविधा देणे ही आमची प्राथमिकता आहे. मलवाहिनी प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर स्वच्छतेच्या समस्या मोठ्या प्रमाणात कमी होतील. भविष्यातही विकासकामांना प्राधान्य देऊन नऱ्हेला आदर्श व सुबक परिसर म्हणून विकसित करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत." या भूमिपूजन सोहळ्यास नगरसेवक हरिदास चरवड, राजाभाऊ लायगुडे, नगरसेविका सौ जयश्री भूमकर , सौ, कोमल नवले,माजी नगरसेवक बाळासाहेब नवले, भाजप मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे, सागर भुमकर, भाजपा प्रभाग अध्यक्ष राजू कुटे, सारंग नवले, संतोष कुटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी शेखर वाल्हेकर, प्रदीप भूमकर, कैलास वाल्हेकर, तेजस कुटे, संभाजी काकडे, प्रियांका पवार, बेबी सातपुते, लक्ष्मी अनगरकर, दशरथ मणेरे, किरण वळसनकर, रमेश गायकवाड आदींसह कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. या प्रकल्पामुळे नऱ्हे परिसरात आधुनिक मलनिस्सारण व्यवस्था निर्माण होणार असून भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून मजबूत पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत. परिणामी नऱ्हेचा विकास अधिक वेगाने होऊन नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

चेअरमनपदी विक्रम सिंह माने तर व्हाईस चेअरमन पदी सुरेश होले यांची निवड

दौंड (दै. आरंभ पर्व)

पुणे विभाग शिक्षक पत संस्थेच्या चेअरमन पदी विक्रम सिंह माने तसेच व्हाईस चेअरमन पदी सुरेश होले तर सचिवपदी अनिता डेरे यांची निवड करण्यात आली, या संस्थेचे कार्यक्षेत्र हे सातारा, सांगली,सोलापूर, कोल्हापूर, पुणे,रायगड हे असून प्रत्येक जिल्ह्यामध्ये पतसंस्थेचे कार्यालय आहेत या संस्थेची स्थापना 1976 मध्ये झालेल्या असून लवकरच सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात येणार आहे, या संस्थेचे 21 संचालक असून सर्व संचालक हे पतसंस्था तसेच सभासदांचे हित कसे जोपासले जाईल यासाठी प्रयत्न करीत आहेत, या संस्थेच्या व्हाईस चेअरमन पदी सुरेश निवृत्ती होले यांची निवड झाल्याने त्यांच्या दौंड तालुक्यातील गोपाळवाडी गावामध्ये तसेच तालुक्यामध्ये त्यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले जात आहे, गोपाळवाडी गावातील श्रीमती जिजामाता भागवत माध्यमिक विद्यालय गोपाळवाडी या संस्थेमध्ये ते गेल्या 32 वर्षापासून ज्ञानदानाचे काम करीत आहेत, यावेळी नवनिर्वाचित व्हाईस चेअरमन सुरेश होले म्हणाले की, संस्थेचे तसेच सभासदांचे हित जोपासण्याचे काम तसेच जो सभासदांनी जो विश्वास माझ्यावर दाखविला आहे त्याला साथ ठरवण्याचे काम मला मिळालेल्या कालावधीमध्ये नक्कीच केले जाईल, या निवडी वेळी संस्थेचे मुख्य विश्वस्त गुलाबसिंग कदम, चेअरमन विक्रम सिंह माने, सचिव अनिता डेरे, शहाजी अवचर, राजाराम पासलकर, आदिनाथ गिरमे आधीसह संचालक यावेळी उपस्थित होते.

सोमेश्वर फाऊंडेशन व मनोदय व्यसनमुक्ती संस्थेचे नवे केंद्र सुरू

- वस्तीपातळीवर व्यसनमुक्तीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल

पुणे (दै. आरंभ पर्व)

सोमेश्वर फाऊंडेशन आणि मनोदय व्यसनमुक्ती संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पाषाण रोडवरील लमाणतांडा येथे नव्या व्यसनमुक्ती केंद्राचे उद्घाटन उत्साहात पार पडले. हा कार्यक्रम मा. नगरसेवक सनीदादा निम्हण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सामाजिक कार्यकर्ते लहु खेतावत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

गेल्या सात वर्षांपासून मनोदय व्यसनमुक्ती संस्था वस्तीपातळीवर कार्यरत असून, विशेषतः किशोरवयीन मुलांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी विविध जनजागृती उपक्रम राबवत आहे. सोमेश्वर फाऊंडेशनच्या सहकार्यामुळे आता हे कार्य लमाणतांडा परिसरातही विस्तारले आहे.

सोमेश्वर फाऊंडेशन ही संस्था देखील गेली अनेक वर्षांपासून व्यसनमुक्ती आणि जनजागृतीसाठी सातत्याने कार्यरत आहे. वेळोवेळी मॅरेथॉनचे आयोजन करून समाजात व्यसनमुक्तीचा संदेश दिला जातो. अमली पदार्थांविरोधात जनजागृती करण्यासाठी पथनाट्यांचे सादरीकरण तसेच योग शिबिरांचे आयोजनही संस्थेतर्फे केले जाते. तसेच शैक्षणिक स्पर्धा, आरोग्य, संस्कृती आणि रोजगार या विविध क्षेत्रांत संस्था सक्रिय आहे. विशेषतः पाषाण–सोमेश्वर परिसरातील गरजू विद्यार्थी, महिला आणि युवकांसाठी रोजगारनिर्मिती व कौशल्यविकासासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील असून 'पुणे आयडल'सारख्या सांस्कृतिक उपक्रमांमधूनही आपला ठसा उमटवत आहे.तसेच मनोदय व्यसनमुक्ती संस्था गेल्या सात वर्षांपासून वस्तीपातळीवर कार्यरत असून, विशेषतः पौगंडावस्थेतील मुलांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी विविध उपक्रम राबवत आहे.

या उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर मागील आठवड्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मदतीने स्क्रीन व्यसन व इतर व्यसनांवर सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणातून अनेक नागरिकांनी व्यसनमुक्त होण्याची तयारी दर्शविल्याने संस्थेच्या कार्याला नवी दिशा मिळाली आहे.

कार्यक्रमादरम्यान सनी निम्हण यांनी उपस्थित किशोरवयीन मुलांशी संवाद साधत शिस्त, शिक्षण आणि योग्य मार्गदर्शनाचे महत्त्व अधोरेखित केले. "उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षण आणि योग्य सवयी आवश्यक आहेत," असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना सकारात्मक जीवनशैलीचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

या उपक्रमासाठी सातत्याने सहकार्य आणि सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल सोमेश्वर फाऊंडेशन तसेच सनी निम्हण यांचे मनोदय व्यसनमुक्ती संस्थेतर्फे आभार मानण्यात आले. कार्यक्रमाला मनोदय व्यसनमुक्ती संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. विष्णू श्रीमंगले यांच्यासह मैत्रेयी पाध्ये, सूरज शिंदे, सुदर्शन वढाराव आणि इतर टीम सदस्य उपस्थित होते.

आरक्षणाच्या लढ्याला मोठे यश: ३३ हजार हरकतींचा टप्पा पार

पुण्यात २६ एप्रिलला संयुक्त गोलमेज परिषद

पुणे (दै. आरंभ पर्व)

महाराष्ट्र सरकारच्या प्रस्तावित अनुसूचित जाती (SC) आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधात सुरू असलेल्या लोकचळवळीला मोठा प्रतिसाद मिळत आहे.'महाराष्ट्र अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण पुनर्विलोकन समिती' (पद्मपाणी फाउंडेशन) तसेच विविध पक्ष, संघटना व सामाजिक संस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आतापर्यंत प्रशासनाकडे ३३,००० पेक्षा अधिक हरकती ईमेलद्वारे प्राप्त झाल्या आहेत. ही संख्या समाजातील तीव्र अस्वस्थता आणि वाढती जागृती दर्शवणारी मानली जात आहे.

आज पुनर्विलोकन समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने बार्टी (BARTI), पुणे येथील निबंधकांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या बैठकीतून दोन महत्त्वाचे मुद्दे समोर आले. प्रथम, उपवर्गीकरणाविरोधात पाठविण्यात आलेल्या प्रत्येक हरकतीला प्रशासनाकडून अधिकृत पोहच (Acknowledgment) दिली जाईल, असे आश्वासन देण्यात आले. यामुळे प्रत्येक हरकतीची अधिकृत नोंद होणार असून प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दुसरे म्हणजे, न्यायमूर्ती अनंत बदर समितीच्या कार्यपद्धतीबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. समितीने अहवाल तयार करताना पारदर्शकता न ठेवता जनभावनांचा पुरेसा विचार केला नाही, तसेच संपूर्ण प्रक्रिया गोपनीय ठेवली, असा आरोप करण्यात आला. त्यामुळे हा अहवाल नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना धरून नसल्याची टीका करण्यात आली.

राहुल डंबाळे यांनी प्रशासनाला इशारा देताना सांगितले की, "या ३३ हजार हरकती केवळ तांत्रिक बाब म्हणून न पाहता, त्यामागील सामाजिक भावना आणि कायदेशीर मुद्द्यांचा गांभीर्याने विचार करावा. बदर समितीने जनतेला मत मांडण्याची संधी का दिली नाही, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. शास्त्रीय डेटाशिवाय आणि राजकीय हेतूने केलेले उपवर्गीकरण समाजात फूट पाडू शकते."दरम्यान, या चळवळीला अधिक बळ देण्यासाठी आणि पुढील कायदेशीर रणनीती निश्चित करण्यासाठी २६ एप्रिल २०२६ रोजी पुण्यात 'संयुक्त गोलमेज परिषद' आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत विविध क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शन करणार असून पुढील लढ्याची दिशा ठरवली जाणार आहे. "आरक्षणाचे घटनात्मक अस्तित्व टिकवण्यासाठीचा हा लढा ३३ हजार हरकतींवर थांबणार नाही, तर तो आणखी तीव्र करण्यात येईल," असा ठाम निर्धार राहुल डंबाळे यांनी व्यक्त केला.

पल्सर १८० परतली! हेडलॅम्प आणि ब्लूटूथ कनेक्टिव्हिटीसह सज्ज

पुणे (दै. आरंभ पर्व)

बजाज ऑटो या जगातील सर्वात व्हॅल्यूएबल टू-व्हीलर आणि थ्री-व्हीलर कंपनीने आज भारतातील सर्वाधिक लोकप्रिय आणि आयकॉनिक मोटरसायकल्सपैकी एक असलेल्या पल्सर 180 च्या पुनरागमनाची घोषणा केली आहे! नव्या ग्राफिक्स, एलईडी हेडलॅम्प, ब्लिंकर्स आणि ब्लूटूथ कनेक्टेड डिजिटल कन्सोलसह सुसज्ज असलेली ही मोटरसायकल, रायडर्सच्या दमदार मागणीमुळे पुन्हा सादर करण्यात आली आहे. पल्सर ब्रँडच्या दोन महत्त्वाच्या मॉडेल्सपैकी पल्सर 150 आणि पल्सर 180 यांच्या लाँचला 25 वर्षे पूर्ण होत असताना, ही मोटरसायकल अधिक शार्प आणि विकसित अवतारात परतली आहे. या पुनरागमनामुळे पल्सर ब्रँडच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा अधोरेखित झाला आहे. भारतामध्ये पल्सर180 लाँच करण्यात आली तेव्हा, परफॉरमन्स मोटरसायकलिंगमध्ये नवे मापदंड निश्चित झाले होते. उच्च सीसी मोटरसायकलच्या परफॉरमन्स आणि दैनंदिन वापरातील सोयी यांची सांगड घालण्यात आली. पल्सरने भारतात स्पोर्ट्स मोटरसायकलिंगचा नवा अध्याय सुरू केला. पल्सर 180ने पल्सर ब्रँडचा पाया घातला आणि त्याचा भक्कम वारसा निर्माण केला.

सिग्नेचर ग्लोबल आणि टोनिनो लॅम्बोर्गिनी यांच्याकडून निवासी प्रकल्पाची घोषणा

मुंबई (दै. आरंभ पर्व)

भारतातील आघाडीच्या रिअल इस्टेट डेव्हलपर्सपैकी एक असलेल्या सिग्नेचर ग्लोबलने सेक्टर ७१, गुरुग्राम येथे प्रीमियम निवासी प्रकल्पाच्या विकासासाठी इटालीतील प्रसिद्ध लाइफस्टाइल ब्रँड टोनिनो लॅम्बोर्गिनी यांच्याशी रणनीतिक सहकार्याची घोषणा केली आहे. प्रसिद्ध कारागिरी, डिझाईनची उत्कृष्टता आणि लक्झरी जीवनशैलीसाठी जगभरात ओळखल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित अशा टोनिनो लॅम्बोर्गिनी ब्रँडच्या अंतर्गत इटालियन निवासी अनुभव या एक्सक्लूझिव्ह विकासातून सादर होणार आहे. या भागीदारीतून टोनिनो लॅम्बोर्गिनीचा भारतातील निवासी रिअल इस्टेट बाजारपेठेत लक्षणीय प्रवेश होत असून ब्रँडेड निवासी घरांच्या क्षेत्रात एक नवीन मापदंड निर्माण होणार आहे. हा प्रकल्प सुमारे १२.४० एकरांवर पसरला असून या विकासप्रकल्पात ३, ४ व ४.५ बीएचके प्रकारांमधील ८१२ प्रीमियम निवासस्थाने आकर्षण ठरणार आहेत. धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या अशा सेक्टर ७१, सदर्न पेरिफेरल रोड येथे त्याचे स्थान आहे - हे स्थान गुरुग्रामधील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या रिअल इस्टेट कॉरिडॉरपैकी एक आहे. सॅव्हिल्स इंडियाच्या मते, ब्रँडेड रेसिडेन्सेस सेगमेंटला जागतिक पातळीवर सातत्याने मोठी गती मिळत आहे. या सेगमेंटमधील योजनांची एकूण संख्या डिसेंबर २०२४ मधील ७६४ वरून २०२५ च्या अखेरीस ९१० पर्यंत वाढण्याचा अंदाज आहे, ही वार्षिक १९ टक्क्यांची भरीव वाढ आहे.

भीमशक्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांनी हटवले दफनभूमीवरचे अतिक्रमण

राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)

शहराजवळील चांडोली येथील भीमा नदीकाठाजवळच्या मागासवर्गीय दफनभूमीवरचे अतिक्रमण भीमशक्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांनी काढून टाकले. चांडोली (ता. खेड) येथे भीमा नदीच्या काठाजवळ मागासवर्गीय दफनभूमीची जागा आहे. त्याठिकाणी अतिक्रमण करून सिमेंटचे साहित्य बनविण्याचा कारखाना सुरू करण्यात आला होता. याबाबत खेड तहसीलदार कार्यालयापासून मुख्यमंत्री कार्यालयापर्यंत सर्वांना निवेदने देऊन हे अतिक्रमण हटविण्याची मागणी वेळोवेळी केलेली होती. पोलिसांकडेही अनेकदा तक्रारी दिल्या होत्या. आंदोलनाचे इशारेही दिले होते, पण कार्यवाही होत नव्हती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे भीमशक्ती संघटनेचे कार्यकर्ते कार्यक्रमासाठी जमले होते. कार्यक्रम झाल्यानंतर संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय डोळस यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते त्याठिकाणी दफनभूमी येथे गेले आणि घोषणा देत त्यांनी अतिक्रमण हटविले. कार्यकर्त्यांनी तेथे उभारलेले शेड पाडले. त्यानंतर त्या जागेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची स्थापना केली. संघटनेचे तालुकाध्यक्ष अनिल जाधव, किशोर डोळस, मंगेश जाधव, नीता आल्हाट, कांताराम सोनवणे आदी कार्यकर्ते या कारवाईत सहभागी झाले होते.